# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | श्री. अचलकुमार टिल्लू |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | १९९९ |
| वर्ष | : | चौथे |
| अंक | : | १ |
| पृष्ठे | : | ३८ पृष्ठे |


**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**
**"ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : २८**

विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक

# दिशा



र्ष चौथे / अंक १/ जुलै १९९९

## संपादकीय

### शाळा प्रवेश

सुट्टी संपली, शाळा सुरू झाली. पालकांची व मुलांची पुस्तके, वह्या, दप्तरे यासाठी धावपळ चालू आहे. पूर्वप्राथमिक (कनिष्ठ बालवाडी) शाळेत प्रवेश न मिळालेल्या पालकांची आपल्या विभागातील किंवा एखाद्या विशिष्ट शाळेत प्रवेश घेण्यासाठी अजूनही धडपड चालू आहे. ती त्यांची केविलवाणी धडपड बघून वाईट वाटते पण त्याला इलाज नाही. अशा वेळी ३०-४० वर्षापूर्वीची म्हणजे सध्याच्या तरुण पिढीच्या बालपणाची आठवण येते. तेव्हा कोणत्या शाळेत प्रवेश घ्यायचा याला मोकळिक होती. आता तसे नाही. कारण आजकाल शाळा प्रवेशाची समस्या अत्यंत बिकट झाली असून पालकांनी याबाबतीत दक्ष रहाणे अत्यंत जरूरीचे आहे व त्यातही विशेषतः इंग्रजी माध्यम शाळेत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या पालकांनी. कारण इंग्रजी माध्यम शाळांची संख्या कमी आहे व दिवसेंदिवस त्या शाळेत प्रवेश मिळवू इच्छिणाऱ्यांची संख्या अधिक आहे. मराठी चांगल्या शाळाच्या बाबतीत काही प्रमाणात हाच प्रकार आहे पण मराठी शाळेच्या प्रवेशाचा प्रश्न तेवढा बिकट नाही. तेव्हा प्रवेश न मिळालेल्या पालकांच्या मनाची व त्यांच्या समस्येची यावरून कल्पना यावी. यापुढे प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या पालकांसाठी अनुभवाने काही सूचना कराव्याशा वाटतात.

१) आपल्या मुलाला किंवा मुलीला ३ वर्षे पूरी होण्यापूर्वी वर्ष-सहा महीने आधी आपल्याला हव्या असलेल्या शाळेच्या मुख्याध्यापकाला भेटून आपली मनीषा सांगणे व प्रवेशाची जुजबी माहिती करून घेणे.

२) मूल ३ वर्षांचे पुरे झाल्यावर वा पुरे होण्याच्या जवळ असेल तर त्यावर्षीच्या नोव्हेंबर पासून ठरवलेल्या शाळेत दर ८-१५ दिवसांनी फेरी मारणे व अर्ज वाटप कधी करणार याबद्दल माहिती मिळवणे. यासाठी कदाचित ४ ते ६ महीने खेटे घालावे लागतील. पण आपल्या पाल्यासाठी एवढे कष्ट घेणे जरूरीचे आहे.

३) अर्ज देण्याची तारीख समजल्यावर गर्दी न करता नमूद केलेल्या दिवशी अर्ज विकत घेणे.

४) कोणत्या वर्षीच्या व कोणच्या तारखेपर्यंतच्या मुलांना प्रवेश दिला जाईल हे अर्जात नमूद केलेले असतेच पण तसे नसल्यास स्पष्ट विचारून मगच अर्ज घेणे.

५) अर्जासोबत जोडावयाच्या शिधापत्रिकेची प्रत व ते नसल्यास आपण रहात असलेल्या विभागातील कोणतीही पालकाच्या नावाची वीज अथवा पाणी बीलाची अद्यावत प्रत आणि स्वच्छ अक्षरात (खोडाखोड नसलेली) पाल्याच्या जन्मदिनाकांचा नगरपालिकेचा वा तत्सम योग्य अधिकाऱ्याचा दाखला. यांची तजवीज आधीच करून ठेवणे.

(मलपृष्ठ क्र. ३ वर)



विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक

# दिशा

वर्ष चौथे / अंक १ / जुलै १९९९

**संपादक**
श्री. अचलकुमार टिल्लू

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

**सहसंपादक**
सौ. मंजिरी दांडेकर

**सहाय्यक मंडळ**
श्री. संतोष राणे
श्री. संजय बोरकर
सौ. मनाली देवधर
सौ. विशाखा देशपांडे
सौ. भारती जोशी
सौ. विजया भंडारे
सौ. मंगला पाटनेकर
कु. दिपाली भाटकर
कु. सुंगधा चव्हाण

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.

**मुद्रक:**
परफेक्ट प्रिण्टस्,
२२, ज्योती इंडस्ट्रियल इस्टेट,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | श्री. अचलकुमार टिल्लू | मुखपृष्ठ |
| २) | आवाहन | | २ |
| ३) | 'गनिमीकावा' या युद्धशास्त्राचे अनमोल उदाहरण 'प्रतापगड युद्ध' | श्री. अरुण ठाकूर | ३ |
| ४) | उद्योजकतेचे बालामृत | श्री. प्रवीण प्रधान | ६ |
| ५) | ''वि.प्र. मंडळाच्या बोध चिन्हाची कथा' | श्री. रवी सिन्नरकर | १० |
| ६) | प्रचलित शिक्षण-किती कालबाह्य ? किती कालोचित ? | सौ. मंजिरी वा. दांडेकर | १२ |
| ७) | मी कोण आहे ? | श्री. अनिल शाळीग्राम | १५ |
| ८) | सहजसिद्धी | श्री. अरविंद दोडे | १८ |
| ९) | आदरणीय प्राध्यापकहो... | श्री. अजित जोशी | २१ |
| १०) | एड्सच्या विळख्यात : एक वाचनीय पुस्तक | प्रा. मोहन पाठक | २३ |
| ११) | मराठी भाषा संकल्प प्रतिज्ञा | श्री. अ.वि. सहस्रबुद्धे | २५ |
| १२) | परीक्षा पद्धतीला अवास्तव महत्त्व दिले जात असल्याने शिक्षणाची मूळ उद्दिष्टे साध्य होत नाही. | श्री. प्र. ग. वैद्य | २८ |
| १३) | शतकातले अखेरचे शैक्षणिक वर्ष | प्रा. मोहन पाठक | ३१ |
| १४) | 'दिशा' वर्ष ३रे लेख सूची | सौ. मंजिरी दांडेकर | ३५ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी विद्याप्रसारक मंडळ तसेच संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

स.न.

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ६० वर्षे शिक्षणक्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान व विधी शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व संगणक अभ्यास केंद्र अशी सर्वांगीण शिक्षणाची व्यवस्था संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून संस्था विविध उपक्रम राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा व स्पर्धात उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रात कार्यप्रवण आहेत.

आज टी.व्ही., व्हिडिओ, सिनेमा व तत्सम नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. उद्याचे नागरिक बनणाऱ्या संस्कारक्षम विद्यार्थ्यांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी, व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने 'दिशा' हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

आपण या मासिकाचे वर्गणीदार होऊन किंवा या मासिकात जाहिरात देऊन आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती !

आपला विश्वासू

संपादक, दिशा

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे.**

# 'गनिमीकावा' या युद्धशास्त्राचे अनमोल उदाहरण 'प्रतापगड युद्ध'

**श्री. अरूण ठाकूर**

*शिवाजी महाराजांच्या काळात ज्या अनेक लढाया झाल्या तेथील प्रतापगडचे युद्ध ही एक महत्त्वाची लढाई होती. या विषयाच्या निमित्ताने गिर्यारोहक व ख्यातनाम कलावंत श्री. अरूण ठाकूर यांनी लिहिलेला लेख येथे देत आहोत -संपादक*

अवसेचा अंधार असे परि मनात ईर्षा पुनवेची।
तृणांकुरांना इथेच फुटली दुधार पाती सुडाची॥

श्री भवानी देवीच्या तेजस्वी प्रेरणेने स्वराज्य स्थापनेचे स्वप्न शिवाजीमहाराज व त्यांचे मावळे साकार करीत होते. त्या स्वातंत्र्याचा घास घ्यावयास तो स्वातंत्र्याचा प्रयत्न पायाच्या टाचेखाली चिरडून टाकावयाच्या गर्जना करीत एक महाभयंकर झंझावात प्रचंड शक्तिनिशी चालून आले. त्याची कर्तबगारीही तेवढीच प्रचंड होती. त्याच्या समशेरीचा दरारा असा होता की, सारी दख्खन आणि लंका त्याच्या धाकाने थरकापत होती. औरंगजेबासारख्या महापाताळयंत्री कर्दनकाळालाही बीदर कल्याणीच्या मोहीमेत त्याने आपल्या लष्करी करामतीचा तडाखा दिला होता.

अशा या अफजलखानाचा फिरंगी दिनांक १० नोव्हेंबर १६५९ रोजी मध्यान्ही शिवाजी महाराजांनी मोठ्या कौशल्याने वध करून व त्याच्या प्रचंड फौजेचा आपल्या क्षुल्लक मावळी फौजेनिशी धुव्वा उडविला आणि प्रचंड विजय मिळविला. या राजनीतीला, गनिमी युद्ध नीतीला आणि शौर्याला उभ्या जगात तोड नाही.

युद्ध शास्त्राच्या दृष्टीने जगातील पाच महत्त्वपूर्ण युद्धात शिवचरित्रातील अत्यंत कठीण असा समरप्रसंगाचा, प्रतापगड युद्धाचा समावेश आहे. 'गनिमीकावा' या पद्धतीने खेळले गेलेले हे युद्ध जगातील एकमेव उदाहरण आहे.

शिवछत्रपतींचा युद्धनीती हा जगभराच्या युद्धशास्त्राच्या संशोधकांच्या संशोधनाचा विषय आहे.

शिवाजी महाराज त्यावेळी एका विशेष प्रकारच्या युद्धपद्धतीचे जनक होते. ते शास्त्र म्हणजे 'गनिमीकावा' होय. सावशीच्या लढाईचे वर्तमान ऐकल्यानंतर पुण्याहून पटवर्धनांच्या वकिलाने मिरजेस जे पत्र लिहिले त्यात गनिमि लढाईचा अर्थ आला आहे. तो असा- ''शत्रूचे सामान भारी असल्यास बुनगे एकीकडे लावून धावे आणि सडी फौज करून आज या ठाण्यावर, उद्या दुसऱ्या ठाण्यावर या प्रमाणे गनिमाई करावी.''

समर्थांनी वर्णिलेल्या महाराष्ट्र धर्मात गनिमी युद्धा 'वृक युद्ध' (लांडगे तोड) असे नाव दिले आहे. या युद्धात थोड्या सैन्यानिशी मोठ्या सैन्याला तोंड देऊन त्याचा नाश करता येतो. शिवाय अशा युद्धास डोंगराळ प्रदेश असल्यास त्याची युद्ध करणाऱ्यास चांगली मदत होते.

ज्या प्रदेशात युद्ध करावयाचे असते तेथील खडानखडा माहीती सेनापतीस असावी लागते. ती माहिती महाराजास जितकी होती तितकी खानाला नव्हती. दुसऱ्याने दिलेल्या माहितीवर विसंबून त्याला आपल्या मोहीमेच्या तजविजी व हालचाली ठरविणे भाग पडले होते. दहा वर्षे

ह्या भागात राहिल्यामुळे थोडीफार माहिती त्याला होती. पण लढाईच्यावेळी खास प्रसंगी उपयोगी पडेल अशी या भागाची पहाणी त्याने केली नसावी.

महाराज लढाईशिवाय इतरवेळीही असल्या प्रदेशाच्या सर्व भागातून, दऱ्याखोऱ्यातून, जंगलातून, घाटातून फिरून वेळप्रसंगी कोणत्या जागेचे काय महत्त्व आहे व तिचा पुढे काय उपयोग होईल याचा आपल्या आरंभिलेल्या कार्यक्रमावर दृष्टी देऊन विचार करीत असत. फौजा लपविण्यासाठी जागा कोठे आहेत, लहान लहान टोळ्यांनी रहाण्यामध्ये जंगलांचा व झाडीचा कीती फायदा होतो, रात्रीचा व काळोखाचा फायदा घेऊन शत्रूचे पहारे व चौक्या लुटता येणे व चुकविणे कसे शक्य असते, त्या चुकवून त्याच्या छावणीमध्ये सड्या टोळ्यांनी आत घुसून त्याची नासधूस कशी करता येते, त्यामुळे शत्रूचा गोंधळ होऊन त्या धावपळीत अंधारामुळे त्याच्याच गोळागोळीने त्याचीच माणसे कशी जायबंदी होतात, अशा अचानक हल्याने धाडशी सेनापतीचा वचक शत्रूवर कसा बसतो, यामुळे शत्रूचा जोम व हिम्मत कशी कमी होते, त्याच्या गोळागोळीने झालेली त्याची हानी ही स्वतःच्या माऱ्यामुळे झाली हे नकळून प्रतिपक्षाच्या छाप्यामुळे झाली असे वाटून हल्ला करणाऱ्या सैन्याचा दरारा व भय त्याला कसे वाटते, ह्या कारणामुळे हल्लेवाल्या छोटेखानी सैन्याचा जोम कसा वाढतो वगैरे सर्व गोष्टी व युद्धातील खाचाखोचा महाराजांना पूर्णपणे स्वानुभवाने माहीत होत्या. ह्याप्रमाणे भौगोलिक माहितीचा फायदा घेऊन महाराजांनी आपला हेतू तडीस नेऊन खानाची कशी दुर्दशा केली हे या प्रतापगड युद्धामुळे लक्षात येते.

आपण ठरविलेल्या रणक्षेत्रात शत्रूस लढाई खेळण्यास भाग पाडणे हे या युद्ध शास्त्रातील एक मोठे महत्त्वाचे तत्त्व आहे. महाराजांनी आपल्या मुत्सद्दीपणाने ते साधून घेतले, ही गोष्ट महत्त्वाची आहे. राजकारणाचा युद्धकौशल्याशी किती व कसा निकटचा संबंध असतो त्याचे हे एक उत्तम उदाहरण आहे. कालक्षेप करणे हे जसे युद्धकलेतील एक तत्त्व आहे, त्याप्रमाणे शत्रूचा उत्साह कमी करणे, आपली तयारी वाढविणे, शत्रूला गोंधळात पाडून आपला कार्यभाग साधणे ही सुद्धा त्यापैकीच दुसरी तत्त्वे आहेत.

विजापूर दरबारने 'आम्ही तुमचे बरोबर युद्ध करतो वा तुमच्यावर मोहीम करतो.' असे महाराजास कळविले नव्हते. महाराजांचा कोणी वकील विजापूर दरबारात नव्हता. तरी सुद्धा त्यांचे हेर खाते इतके श्रेष्ठ दर्जाचे होते की, शत्रूच्या दरबारात ठरलेली प्रत्येक गोष्ट त्यांना तात्काळ कळत असे. विजापूर दरबारने आपल्याविरूद्ध युद्ध पुकारल्याची बातमी महाराजांना त्यांच्या हेर खात्याकडून समजली आणि येणाऱ्या प्रसंगाला तोंड देण्याची तयारी महाराजांनी सुरू केली. महाराजांचे सर्व मिळून सैन्य फक्त १० हजार होते.

१२ घोडदळ, १० हजार पायदळ, ८०-९० मोठ्या तोफा, ३००-४०० लहान तोफा, मोठ्या तोफांवरील हजार बाराशे खलाशी, लहान तोफखान्याकडील ४॥हजार खलाशी इत्यादी सैन्यासह खान एप्रिल १६५९ अखेरीस निघाला व जूनमध्ये वाई येथे पोहोचला. येताना वाटेत त्याने नवीन सैन्य उभारण्याचा सपाटा लावला. वाई येथे आल्यानंतर तेथील डोंगराळ मुलखाची सवय व माहिती असलेले ३ हजार मावळे आपल्या पायदळात भरती केले. त्याचे सर्व सैन्य ३५ हजाराच्या जवळपास होते.

विजापूराहून खान निघाल्याची बातमी समर्थ शिष्याकडून समर्थांकडे आली. ती त्यांनी ओवीबद्ध पत्र रूपाने महाराजांकडे पाठविली. ते पत्र पुढिलप्रमाणे आहे.-

विवेके करावे कार्य साधन।
जाणार नरतनु हे जाणोन।
पुढील भविष्यार्थी मन।
रहाटोची नये॥१॥

चालो नये असन्मार्गी।
सत्यता धाणल्या अंगी।
रघुवीर कृपा ते प्रसंगी।
दास महात्म वाढवी॥२॥
रजनीनाथ आणि दिवाकर।
नित्यनेमे करीती संचार।
पालिताती येरझार
लाविले भ्रमण जगदीशे॥३॥
आदिमाया मूळ भवानी।
हे ची जगताची स्वामिनी।
एकांती विवेके धरुनी।
इष्ट योजना करावी॥४॥

ह्या वरील ओव्या जर नेहमी प्रमाणे वाचल्या तर त्यात विशेष असे काहीच नाही. त्यात गुप्त बातमी सांगितल्याची शंका सुद्धा येणार नाही. परंतु प्रत्येक ओळीचे पहिले अक्षर घेऊन ती सर्व अक्षरे एकापुढे एक मांडली तर ती एक महत्त्वाची बातमी दिसून येईल. ती बातमी म्हणजे 'विजापूरचा सरदार निघाला आहे' ही होय. शेवटच्या दोन ओळीत विवेकाने योग्य योजना करावी असा उपदेश आहे.

प्रतापगडाच्या लढाईत बचावाच्या धोरणाच्या दृष्टीने महाराजांना पारघाटाचा व प्रतापगडसारख्या तटबंदीच्या जागेचा अतिशय उपयोग झाला. या युद्धाचा ज्यास्त बारकाईने अभ्यास करावयाचा तर गडाच्या पूर्वेच्या २४ मैलाच्या व उत्तर दक्षिणेकडील ८/१० मैलाच्या सर्व टापूतील प्रदेशाची सूक्ष्म दृष्टीने पहाणी करावी लागेल. पहाडाच्या सोंडांचा, किल्याचा, नद्यांचा, घाटांचा व खोज्यांचा युद्धकौशल्याच्या दृष्टीने किंवा स्थानिक डावपेचांचा विचार करण्याच्या दृष्टीने कसा उपयोग होतो हे या युद्धातून दिसून येते.

महाराजांचे दोन सेनापती शामराजपंत पद्मनाभी व त्रिंबकपंत युद्धात पडले तरीही त्यांच्या फौजांनी घाबरून पळून न जाता शत्रूला तोंड देत आपली कामगिरी फत्ते केली. ही गोष्ट विशेष लक्षात ठेवण्यासारखी आहे. त्यावेळच्या मानाने कौतुकास्पद आहे. पूर्वी सेनापती वा सरदार पडला तर सैनिक पळून जात. आपला म्होरक्या पडला तरी लढत रहाण्याची व कामगिरी फत्ते करण्याची हिम्मत प्रत्येक शिपाई गड्यात निर्माण केली गेली ती शिवकालातच.

नंतरच्या काळातही व पुढे १८०३ पासून १८४३ पर्यंत मराठ्यांची इंग्रजां-बरोबर जी युद्धे झाली त्यातील काही युद्धात मराठ्यांचा जय झाला. परंतु त्याचा यथायोग्य फायदा न घेता व माघार घेतल्यामुळे इंग्रजांना यश मिळून मराठ्यांचा विमोड झाला. असे इतिहास सांगतो.

अशा प्रकारच्या घोडचुका महाराजांच्या शिस्तीखाली तयार झालेल्या सेनापतींनी व फौजांनी न केल्यामुळे व आपल्यावर सोपविलेली कामगिरी उत्कृष्ट रीतीने तंतोतंत पार पाडल्यामुळे, आपल्याहून दुप्पट-तिपटीने असलेल्या शत्रूवरही महाराजांना विजय मिळविता आला.

अशा या मौलिक युद्ध प्रसंगाचे व अशा या पावन युद्ध भूमीचे नीट आकलन व्हावे, घडल्या प्रसंगाच्या इतिहासाचे व भौगोलिक परिसराचे तसेच कुशल युद्ध नैपुण्य व लष्करी डावपेच आणि उत्साही नेतृत्त्व याचे थोडे बहुत दर्शन घडावे या निर्मळ हेतूने महाराष्ट्रात प्रथमच अफजलखान स्वारीचे 'प्रतापगड युद्ध दर्शन' नावाचे ध्वनी व प्रकाशाचे माध्यमातून १९८२ मध्ये एक युद्ध दर्शन मी तयार केलेले आहे. या ऐतिहासिक प्रसंगाचे कथन शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी केलेले असून संगीत रचना कै. वसंत देसाई यांची आहे. मूळ कल्पना, कला दिग्दर्शन व प्रकाश योजना माझे आहे. ध्वनिप्रकाशाचे माध्यमातून साकारलेले युद्ध शास्त्रावरील असे फिरते प्रदर्शन

(पान क्र. २४ वर)

# उद्योजकतेचे बालामृत

श्री. प्रवीण प्रधान

*मराठी माणूस स्वतंत्रपणे उद्योग करीत नाही किंबहुना उद्योगाकडे वळणे हे त्याला धोक्याचे वाटते काळाच्या ओघात ही मानसिकता बदलणे आवश्यक आहे. अनेक नवीन उद्योग क्षेत्रात असणाऱ्या आव्हानांना मराठी माणसाने सामोरे गेले पाहिजे त्यासाठी आपली पारंपारिक मानसिकता बदलली पाहिजे. हे व असे मुद्दे या लेखात आपण वाचू शकाल - संपादक*

माझा एक मित्र आपल्या दोन जुळ्या मुलांसाठी सुयोग्य मुलींची स्थळे पहात होता. संगणकतंत्रज्ञ असलेल्या या जुळ्या भावांपैकी एक भाऊ नोकरी करतो व दुसऱ्याचा संगणक तयार करण्याचा उत्तम व्यवसाय आहे. सांगण्याचा मुद्दा म्हणजे नोकरीत असलेल्या मुलाला मुली सांगून येत होत्या, मात्र स्वतःचा उद्योग असलेल्या त्याच्या भावाला मुलींच्या पालकांकडून थंड प्रतिसाद मिळत होता. कारण होतं, उद्योजक असलेल्या तरुणाला आर्थिक स्थैर्य नसते असा गैरसमज !

मुळात मराठी तरुणांना त्यांच्या कुटुंबात किंवा समाजात स्वतंत्र व्यवसायाची परंपरा क्वचितच असते. नोकरीत असणारे स्थैर्य व नियमित मिळकत उद्योजकाला नसते असा (गैर) समज मराठी माणसांच्या मनात ठसलाय व त्यामुळे उपजत बुद्धीमत्ता, जिद्द व मेहनतीवृत्ती असूनसुद्धा स्वतंत्र उद्योगाकरिता लागणारी धडाडी त्यांच्यात नसते. साहजिकच स्वतःचा उद्योग असणाऱ्या तरुणाला मुलगी देण्याचे धाडस मराठी पालकांकडे कसे असणार. !

मात्र घरण्यात उद्योजकतेची परंपरा नसतानासुद्धा स्वतःचा उद्योग सुरु करण्याची धडाडी कै. लक्ष्मणराव किर्लोस्कर, कॅम्लिनचे कै. काकासाहेब दांडेकर, कै. गरवारे व विकोच्या गजानन पेंढरकर यांनी दाखविली. अलिकडच्या काळात मराठी तरुण स्वयंरोजगाराचा विचार करू लागल्याने आशादायक चित्र दिसू लागले आहे. संगणकयुग व जागतिक औद्योगिक मंदी या गोष्टी लक्षात घेऊन स्वतंत्र व्यवसायाचा विचार तरुणांनी विशेषतः त्यांच्या पालकांनी यापुढे जरुर करावा. पालकांची मानसिकता आपल्या मुलांनी डॉक्टर, इंजिनियर होण्यापलिकडे गेली पाहिजे. काळाजी गरज ओळखून प्रत्येक मराठी घरात एखादा व्यापारी किंवा उद्योजक घडविला पाहिजे.

लघु उद्योजकांच्या संस्थेच्या कार्याचा अनुभव लक्षात घेता असे दिसून आले की पदवीधर तरुण व त्यांचे पालक स्वतंत्र व्यवसायाचा विचार करण्यास तयार नसतात. याचे कारण, त्यांची मानसिकता व दुसरे म्हणजे भरपूर पैसा असला तरच स्वतःचा व्यवसाय सुरू करता येतो असा समज. या अनुभवावरून असे सुचवावेसे वाटते की, आपल्या मुलांची बुद्धीमत्ता, आवड, स्वभाव व कल या गोष्टींचा विचार करून पालकांनी १०वी व १२वी नंतर म्हणजे शालेय शिक्षण पुरे होण्यापूर्वी त्यांच्यासाठी स्वतंत्र व्यवसायाचा विचार करावा. काही दूरदृष्टीच्या पालकांनी या गोष्टींचा विचार केला तर, प्रवासाची आवड असणारा तरुण स्वतःची पर्यटन कंपनी सुरू करू शकतो, वक्तृत्वाची आवड असणारी तरुणी कार्यक्रम संचालिका (Comerer) हा व्यवसाय करू शकते. त्या विषयांची आपल्याला आवड व माहिती असते त्यात व्यवसाय करणे नक्कीच उत्साहजनक असते.

१० वी व १२ वी परीक्षांमध्ये एकूण १६ लाख विद्यार्थी परीक्षेला बसतात, त्यातील अंदाजे ८ लाख उत्तीर्ण होतात. या उत्तीर्ण विद्यार्थ्यांमध्ये बहुसंख्य विद्यार्थी सर्वसामान्य बुद्धीमत्तेचे असतात. विद्यार्थ्यांचे भवितव्य घडविणाऱ्या या दोन परीक्षांना दिले गेलेल्या (अवास्तव) महत्त्वामुळे या परीक्षामधील उज्ज्वल यश हेच अनेकांना साध्य वाटते. मात्र अनेकदा या परीक्षांमध्ये कमी गुण मिळवून उत्तीर्ण होणारे विद्यार्थी किंवा नापास होणारे विद्यार्थी त्यांच्या पुढील जीवनात खूप यशस्वी उद्योजक झालेले दिसतात. शिक्षण म्हणजे फक्त पदवी मिळविणे एवढाच विचार न करता त्याच्या अनुषंगाने इतर गोष्टींचा विचार विद्यार्थी व त्यांच्या पालकांनी करणे आवश्यक आहे. बदलत्या परिस्थितीचा आव्हान म्हणून स्वीकार करून योग्य शिक्षणक्रम तसेच स्वयंरोजगाराची वेगळी वाट चोखाळण्याच्या दृष्टीने विद्यार्थी व त्यांच्या पालकांनी तयारी करावयास हवी.

## उद्योजकांचे अनुभव

आत्मविश्वासाने उद्योगक्षेत्रात धडाडीने पाऊल टाकून त्यात यशस्वी झालेल्या उद्योजकांचा अनुभव आहे की लहान वयात धडाडी असते, उमेद असते तेव्हाच व्यवसायात उतरावे, जबाबदाऱ्या वाढण्यापूर्वी व्यवसायात धडक मारणं सोप असत. मुख्य म्हणजे, पालकांचे प्रोत्साहन या काळात अत्यंत जरूरीचे असते. मुलांची बौद्धिक, मानसिक, शारीरिक क्षमता आणि आवड या गोष्टींचा स्वयंरोजगाराच्या दृष्टीने पालकांनी विचार करणे आवश्यक आहे. छोट्या प्रमाणावर सुरुवात करून हळूहळू व्यवसायाचे स्वरूप वाढवल्यास आर्थिक ताण नक्कीच कमी होतो. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सिंधी समाज देशात मिळेल तिथे वस्ती करून राहिला आणि गोळ्या, कंगवे, कपडे अशाची विक्री करू लागला. आज देशात एक श्रीमंत वर्ग म्हणून हा समाज ओळखला जातो. स्वतंत्र व्यवसायात नोकरी व्यवसायाप्रमाणे अडचणी असतात. पण अशा वेळेला 'Tough time never lasts, but tough people do' हे नेहमी लक्षात ठेवावे. आवडीचा छंद व खेळ हे सुद्धा स्वयंरोजगाराची साधन होऊ शकतात. सचिन तेंडुलकर, शिरीष कणेकर यांची आपल्या समोर उदाहरणे आहेत. आपल्या आवडीच्या छंदांना व खेळांना कुशलतेची जोड दिली आणि व्यावसायिकतेचे तंत्र अवगत केल तर त्यात यश नक्कीच मिळत. कुठल्याही क्षेत्रात यश मिळविणे हे तुमच्या आत्मविश्वासावर तसेच निर्धार व मेहनतीवर अवलंबून असते. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विकासाचा वेग लक्षात घेता उद्योजकतेला अधिकच महत्त्व आले आहे.

हल्लीच्या संगणक माहितीयुगात कोणत्याही उद्योगाविषयी माहिती मिळविणे अत्यंत सुलभ झाले आहे. इंटरनेट तर आता घरोघरी पोहोचला आहे. तुमच्या आवडीचा व्यवसाय निवडा व संगणकाद्वारे जगाच्या कुठल्याही भागातून त्याविषयी व्यवस्थित माहिती मिळवा.

## उद्योजकता प्रशिक्षण

शालेय व उद्योजकता प्रशिक्षण (training) या उद्योजकीय नाण्याच्या दोन बाजू आहेत. विद्यार्थी दशेतील उद्योजकता प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या मनात स्वतंत्र व्यवसायाचे बीज रुजविले जाते व ते त्या दृष्टीने विचार करू लागतात. पदवीधर झाल्यानंतर स्वतःच्या आयुष्यात नोकरी वा स्वतःचा उद्योग यात स्थिर होण्यासाठी जी द्विधा अवस्था असते त्याला समर्थपणे तोंड द्यायला त्यांची मानसिक तयारी होते. लहान मुले अनुकरणप्रिय असतात हे लक्षात घेऊन ८वी ते १२वी पर्यंतच्या पाठ्यपुस्तकात उद्योजकांच्या कथा, आठवणी, दैनंदिनी, पैशाचा विनियोग ते कसा करतात, अडचणींवर मात कशी करतात, योग्य व्यापार किंवा उद्योग कसा निवडतात, साबण, बॅट, चेंडू इ. वस्तूचे उत्पादन कसे करतात अशी माहिती रंजक स्वरूपात दिल्यास विद्यार्थ्यांची स्वतंत्र उद्योगाविषयी मानसिकता तयार होण्यास नक्कीच मदत होईल. संस्कारक्षम वयापासून या विषयाची तोंडओळख

होत राहिली तर काही मुले मुली तरी उद्योजक होतील.

प्रशिक्षणाची गरज आणि स्वयंरोजगाराच्या उपलब्ध वाटा लक्षात घेऊन मुंबई विद्यापीठाच्या बहि:शाल शिक्षण विभागातर्फे वेगवेगळे अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. पर्यटन, आर्थिक गुंतवणूक मार्गदर्शन, शोभिवंत माशांची पैदास, कृत्रिम दागिने डिझाईन करणे, इ व्यवसायांचे प्रशिक्षण देणाऱ्या अभ्यासक्रमांची माहिति बहि:शाल शिक्षण विभाग, कक्ष क्र. २५, मुंबई विद्यापीठ, फोर्ट मुंबई ४०००३२ (दूरध्वनी क्र.२६७३७८२) येथे मिळेल. मुंबईच्या सेंट झेवियर्स व मिठीबाई या शिक्षणसंस्थांमध्ये ७वी/८वी मधील सर्वसामान्य विद्यार्थ्यांसाठी प्लम्बिंग, सुतारकाम, मोटर/स्कूटर दुरुस्ती, इ. उपयुक्त व्यवसायात मार्गदर्शन केले जाते. मिठीबाई विद्यालय तर या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर वरील उद्योगात उपयुक्त असे सामान (kit) देते की ज्याचा विद्यार्थी आपल्या घरी किंवा अर्थाजन करण्यासाठी उपयोग करू शकेल. तंत्रज्ञ तयार व्हावे म्हणून महाराष्ट्रातील काही शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये अभ्यासक्रम सुरू आहेत. यापैकी काही ४थी ते ९वी उत्तीर्ण तर काही १२ वी उत्तीर्णांसाठी आहेत. सस्मीरा या वस्त्रोद्योगाशी संबंधित संस्थेत शालांत परीक्षेनंतरचे वेगवेगळे अभ्यासक्रम आहेत व त्यांची विद्यार्थ्यांना टेक्स्टाईल संबंधित उद्योगात शिरकाव करण्यास मदत होते. भाभा अणुसंशोधन केंद्राचे १०वी ते द्वीपदवीधर विद्यार्थ्यां करता वेगवेगळे अभ्यासक्रम आहेत की ज्याचा विद्यार्थी स्वतंत्र व्यवसायाकरता फायदा घेऊ शकतात.

मुंबई विद्यापीठाच्या Dept. of Adult & Continuing Education and Extension तर्फे 'शिका आणि अनुभव कमवा' असा उपयुक्त प्रकल्प काही वर्षापासून सुरू आहे. या योजनेअंतर्गत महाविद्यालयातील कुठल्याही विद्यार्थ्याने आपल्या आवडीच्या व्यवसायात २४० आठवड्यांचा अनुभव घ्यायचा व त्याचा अहवाल (project report) विद्यापीठाला द्यायचा. विद्यार्थ्यांचा आपल्या पालकाच्या मालकीच्या उद्योगात अनुभव नसावा ही मुख्य अट आहे. या योजनेचा मुख्य फायदा म्हणजे विद्यार्थ्याला आपल्या आवडीच्या व्यवसायात उपयुक्त अनुभव मिळतो व त्याचा त्याला स्वतंत्र उद्योगात उपयोग होतो. शाळा कॉलेजपासूनच विद्यार्थ्यांच्या आवडीला कुशलतेची व अनुभवाची जोड दिली तर उद्योगव्यवसायाविषयी त्यांच्यात नक्कीच आस्था निर्माण होईल.

### शिका आणि कमवा

शिकत असताना आपल्या आवडीच्या व्यवसायात थोडा आर्थिक फायदा झाला तर लहान वयात व्यावसायिक नियमितपणा व स्वकष्टाचा पैसा या गोष्टींचे महत्त्व समजते, तसेच आत्मविश्वास येतो. ८वी ते १२वी पर्यंतच्या मुलांना काही प्रासंगिक सेवा उद्योगावर भांडवल पुरवून त्यांना खरेदी-विक्री प्रत्यक्ष करून शिकता येईल. शैक्षणिक साहित्य, मोजे, सिझनप्रमाणे आंबे, इ. वस्तूंची खरेदी विक्री याचा या दृष्टीने विचार व्हावा. विद्यार्थ्यांनी अभ्यास संभाळून फावल्या वेळात ब्युटीपार्लर, झेरॉक्स मशीनवर, दुकानात, परकीय भाषा भाषांतर, दुभाषी, पर्यटन, खेळणी तयार करणे, इ. व्यवसायात अनुभव व आर्थिक कमाई करू शकतात. स्वतः काम केल्यामुळे आलेले व्यावसायिक अनुभव या मुलांना त्यांच्या पुढील आयुष्यात नक्कीच उपयोगी पडतात. उद्योजकीय व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने व्यवसाय शिक्षण, उद्योजकता प्रशिक्षण व व्यावसायिक अनुभव या गोष्टी आवश्यक आहेत.

### सेवा उद्योग (Service Industry)

डॉ. बात्रा या अर्थशास्त्रज्ञाने फार पूर्वी भाकीत केले होते की '१९९० ते २००० या शतकातील शेवटच्या दशकात जागतिक अर्थव्यवस्था ढासळेल व सेवा उद्योगाला

महत्त्व प्राप्त होईल आणि तेच व्यवसाय मंदीकाळात टिकून रहातील' त्याचे प्रत्यंतर आता येऊ लागले आहे. सेवा क्षेत्रातील व्यवसाय फायदेशीर आहेत. हॉटेल मॅनेजमेंट / कॅटरिंग, फास्ट फुड्स, पर्यटन, परकीय भाषातज्ञ /दुभाषी, ब्युटिशियन ज्युवेलरी डिझायनिंग, बागबगीचे तज्ञ, मोटर/स्कूटर मॅकेनिक, माहिती व्यवस्थापन, माहिती तंत्रज्ञ (Information Technologist), कस्टम क्लिअरिंग एजंट, आर्थिक गुंतवणूक सल्लागार, वाहतूक व्यवसाय, पेट्रोल पंपाकरता लागणारे तंत्रज्ञान व सुटे भाग, विमान/रेल्वे/बस बुकींग एजन्सी, इंडस्ट्रीयल व स्पोर्टस् फोटोग्राफी, कॉम्प्युटर ग्राफिक्स, होम-हेल्थ केअर, फिजीओथेरपीस्ट, कृत्रिम फुले व झाड यांचा व्यवसाय, खेळणी तयार करणे, जेमॉलॉजी, प्रिंटींग टेक्सटाईल डिझाईनिंग, शोभिवंत माशांची पैदास, प्लम्बिंग इ. ही यादी उपलब्ध व्यवसायांची केवळ एक झलक आहे.

**मार्गदर्शक संस्था**

उद्योजकतेविषयी अभ्यासक्रम चालविणाऱ्या काही संस्था खालीलप्रमाणे आहेत.

१. लघुउद्योग सेवा संस्था, साकीनाका, कुर्ला-अंधेरी मार्ग, मुंबई ४०००७२.

(दूरध्वनी क्र. ८५७६०९०,८५७३०९१)

२. महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (M.C.E.D.), लघुउद्योग भवन, शिवडी, कोळीवाडा रोड, शिवडी (पूर्व), मुंबई ४०००१५

(दूर. क्र. ४१६०५१४)

३. महाराष्ट्र व्यवसाय मार्गदर्शन केंद्र, म्युनिसिपल शाळा, भवानीशंकर रोड, दादर, मुंबई ४०००२८.

४. महाराष्ट्र व्यावसायिक निर्माण केंद्र, उषा दर्शन, कर्वे रूग्णालया मागे, नौपाडा, ठाणे (पश्चिम) ४००६०१. दूर. क्र. ५४३५६९६)

५. मिटकॉन (Maharashtra Industrial & Technical Services Ltd.), उद्योगसारथी, एम्. आय. डी. सी., अंधेरी (पूर्व), मुंबई.

६. Entreprenuership Development Institute of India, P. O. Bat, Dist. Gandhinagar, Gujrat 382428.

**२१व्या शतकाचा मंत्र**

व्यापार व उद्योगाचे महत्त्व जाणून सरकारी संस्था SIDBI, तसेच इतर बँका आर्थिक मदत करतात. चाकोरीबाहेरची काही क्षेत्रे वरकरणी खूप खर्चिक वाटतात. पण आपल्या मुलाचा कल नसतानाही काही लाख रूपये भरून आडबाजूच्या सरकारी अनुदान नसलेल्या महाविद्यालयातून त्याला डॉक्टर किंवा इंजिनियर बनविण्याऐवजी तोच पैसा मुलाच्या आवडीच्या उद्योगासाठी भांडवल म्हणून वापरल्यास पुढील आयुष्यात त्याला पैसा, मान व स्वास्थ्य नक्कीच लाभेल. शालेय जीवनातच आपल्या मुलांच्या बौद्धीक, मानसिक व शारीरिक क्षमतेचा विचार करून पालकांनी दूरदृष्टीने त्यांच्यासाठी स्वतंत्र व्यवसायाच्या वेगळ्या वाटेचा विचार करणे हाच २१व्या शतकाचा मंत्र आहे.

**प्रवीण वि. प्रधान**
७३/१०२, सोनचंपा, वसंत विहार,
पोखरण नं.२, ठाणे (प.)-४०० ६०१.
दूरध्वनी क्र. ५४२ ५९२६

•••

# ''वि. प्र. मंडळाच्या बोध चिन्हाची कथा''

**श्री. व्ही. सिन्नरकर**

*प्रज्वलितो ज्ञानमयः प्रदीपः हे बोधवाक्य असणारे विद्या प्रसारक मंडळाचे बोधचिन्ह आपणा सर्वांस चांगलेच परिचयाचे आहे. हे बोधचिन्ह तयार करणारे विख्यात चित्रकार श्री. व्ही. सिन्नरकर यांनी हे बोधचिन्ह कसे बनविले या संबंधीच्या काही आठवणी या लेखात शब्दांकित केल्या आहेत. - संपादक*

विद्या प्रसारक मंडळाच्या बोधचिन्हाविषयी लिहिताना, थोडे मागे वळूनही पाहण्याचा मोह मला होतो. बोधचिन्हांची भारतात प्रथम सुरुवात 'बर्माशेल' या जागतिक कीर्तीच्या तेल कंपनीने केली. १९३६ साली भारतात या कंपनीने आपला व्यापार सुरू केला. कंपनीचे नांव ''बर्मा आईल कंपनी'' असे होते. मग भारतात पेट्रोल पंप व इतर व्यवहाराचा व्याप वाढतांना कंपनीलाही बोधचिन्ह हवे असे ठरले. कंपनीचे इग्लंडमधील एक संचालक समुद्राकाठी फिरायास गेले असताना त्यांच्या मुलांनी समुद्रातील शिंपले घेऊन उत्तम आरास मांडली होती. या संचालकांना शिंपल्याचा मोठा आकार फारच आवडला. यांनी चित्रकारांना सांगून शिंपल्याचेच बोधचिन्ह तयार करुन घेतले. सर्व संचालकांना ही कल्पना फारच आवडली याचे कारण शिंपले जगभर लोकांना माहीत आहे. अशा प्रकारे शिंपला हेच बोधचिन्ह नक्की झाल्यावर कंपनीचे नांवही त्याप्रमाणे ''बर्मा शेल कंपनी'' झालं. हेच नाव व ते शिंपल्याचे बोधचिन्ह आजही जगभर लोकप्रिय आहे.

बोधचिन्ह तयार करताना कोणताही व्यापार, प्रकाशन संस्था, इतरही अनेक व्यवहारात शिक्षण क्षेत्रात. विज्ञानामध्ये सर्वत्र मग बोध चिन्हांची सुरुवात भारतातही झाली. बोध चिन्ह तयार करताना ते कोणत्या कामासाठी वापरायचे, उद्देश काय? त्यावरचा मजकूर, चित्र फोटो, वाचता येण्यासारखा लेखी मजकूर व एकूण चित्राची सजावट उत्कृष्ट प्रकारे तयार करावी लागते. शिवाय हे बोधचिन्हाचे चित्र अगदी लहानात लहान करावे लागते त्या दृष्टीने रेखांकन करावे लागते. बोधचिन्ह एक रंगात अगर अनेक रंगात छापता येते. तरीही शिक्षण क्षेत्रात बॅजेस साठी लेटरहेड्स व इतर वापरासाठी त्याने अनेक लहान मोठे ब्लॉक करावे लागतात. हे थोडे विस्ताराने सांगण्याचे कारण मी ही या विषयाचा तज्ञ चित्रकार कसा झालो तेही सांगतो.

मुंबईत सर जे. जे. स्कूल ऑफ मधून ड्रॉइंग पेंटींगचा डिप्लोमा घेऊन व्यावसायिक चित्रकार बनल्यानंतर, मीही त्यावेळच्या वेगवेगळ्या संस्था, कंपन्या व इतर प्रकाशने यांची बोधचिन्हे तयार करीत गेलो. काही ठळक उदाहरणे अशी ओरिएंट लॉगमन, साने गुरुजी कथामाला, अभिनव कलामंदिर, स्वरनिनाद, रूपदर्शनी, मदर इंडिया, मंगल साहित्य प्रकाशन, अ.वि. गृहप्रकाशन, आनंद मासिक, बालमोहन विद्यामंदिर, अभिनव प्रकाशन, ठाणे मराठी नाट्य संघ, नाट्यमतर ठाणे मेडिको, मराठी ग्रंथ संग्रहालय, भिवंडीचे हरिजन गिरीजन उन्नती मंडळ तसेच आजचा विषय असलेले ''विद्या प्रसारक मंडळ'' या बोध चिन्हाचा थोडक्यात इतिहास हा असा.

विद्या प्रसारक मंडळाने ठाणे शहरात शिक्षण क्षेत्रात फार मोठी क्रांती केलेली आहे. अशा संस्थेच्या बोध चिन्हाचे काम डॉ. वा.ना. बेडेकरांनी माझ्याकडे सोपविले. त्यांचा व माझा आमचे फॅमिली डॉक्टर म्हणून जुना संबंधही

होताच. सुमारे १९५३च्या प्रारंभी डॉ. बेडेकरांनी नौपाड्यावरील एक जुनी लहानशी शाळा व तिचे चालक यांचे कडून ती शाळा ताब्यात घेतली. व तिचे डॉ. बेडेकर विद्यामंदिर असे नामकरण केले. विद्या प्रसारक मंडळ त्यावेळी शिक्षणप्रेमी अशीच मंडळी होती. कै. पी. सावळाराम, कै. गुणाकार जोशी, कै. धों. वा. टिळू, कै. नाना पेठे, श्री. मा.ना.पाटील, श्री. द. ब. खेडें, श्री. परांजपे व इतर अनेक व स्वतः डॉक्टर त्याचे अध्यक्ष होते. त्यावेळी ठाणे शहर लहान होते. न्यू इंग्लीश स्कूल, मो. ह. विद्यालय, टी. जे. हाय. स्कूल अशा २-३ मोठ्या शाळा होत्या. शहराची वस्ती वाढतच होती. मग शाळांची गरज वाढली. डॉ. बेडेकर विद्यामंदिर ही भराभर वाढत गेल. अशावेळी मंडळाचे बोधचिन्ह असावे असे ठरले. डॉक्टरांनी मला बोलावून घेऊन बोधचिन्हात काय काय गोष्टी हव्यात ते लिहून दिले. बोधवाक्य असे दिले गेले.

"प्रज्वलितो ज्ञानमया. प्रदीपहा" खाली संस्थेचे संपूर्ण नाव व स्थापना दिवस. हा मजकूर घेऊन मी ३-४ कल्पना रेखाटने तयार केली व ती या मंडळीकडे दिला. मंडळाने व डॉ. बेडेकरांनी त्यातील उत्तम बोधचिन्ह पसंत केले व मी त्याचे छान मोठे आर्टवर्क तयार करून दिले. मंडळीचे घरचेच काम म्हणून काही मोबदलाही मी घेतला नाही.

अशा प्रकारे बोधचिन्ह तयार झाले ते विद्याप्रसारक मंडळाच्या सर्व कागदोपत्रावर, बॅजेस वर, बोर्डावर चित्रीत केले गेले. नंतर विद्याप्रसारक मंडळाने अनेक संस्था स्थापन केल्या. त्या ठाणे करांना माहीत आहेत. या सर्व संस्था साठी एकच बोधचिन्ह जे मी तयार केले आहे. त्याचा वापर केलेला आहे. ज्ञानाचा प्रकाशही सर्वत्र पसरत आहे. ज्ञानदीपच त्यावर मी काढलेला आहे. ठाण्यातील एका नामवंत शिक्षण संस्थेच्या वाढत्या व्यापाबरोबर हे बोधचिन्ह आज भारत भरच नव्हे तर जगभर गेलेले आहे.

या बोधचिन्हा बाबत स्वतः डॉ. वा. ना. बेडेकरच काय म्हणतात तेच पहा.-

(माझ्या ७५व्या अमृतमयी वाढदिवसा निमित्ताने जी स्मरणिका प्रसिद्ध केली त्यात डॉ वा.ना. बेडेकरांचा आशिर्वादपर लेख छापलेला आहे. त्यात म्हणतात.)

"व्ही. सिन्नरकर कला गुणसंपन्न असे कार्यकर्ते ठाण्यात आहेत. विद्याप्रसारक मंडळासाठी बोधचिन्ह असावे असे ठरले. त्या प्रमाणे मी सिन्नरकरांना बोधचिन्हाची कल्पना व मजकूर दिला. बोध चिन्हाची कल्पना सांगितली. मी दिलेल्या कल्पनेपेक्षा अधिकच छान चित्रकृती त्यांनी तयार करून . हे बोधचिन्ह विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व संस्थातून गोरवाने शोभून दिसते. इतके अर्थपूर्ण असे बोधचिन्ह म्हणजे ठाणेकरांना कायमची भेट व आठवण राहील."

डॉ. वा. ना. बेडेकर,
अध्यक्ष
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे.

श्री. व्ही. सिन्नरकर
'सुर्यकिरण' सोसायटी,
३०२, साने गुरुजी पथ,
शिवाजी नगर, ठाणे - ४०० ६०२.

•••

# प्रचलित शिक्षण-किती कालबाह्य? किती कलौचित?

सौ. मंजिरी बा. दांडेकर

*प्रचलित शिक्षण पद्धती कालोचित नसून कालबाह्य ठरत आहे काय ? शिक्षणाच्या नमका अर्थ काय? या प्रश्नांवावत विचार प्रवृत्त करणारा हा लेख - संपादक*

शिक्षण म्हणजे काय? जीवनाचे अंतिम ध्येय मिळविण्याचे साधन म्हणजे शिक्षण 'विद्या विमोक्षाय विभाति केवला' असे रामगीतेमध्ये सांगितले आहे. याचा अर्थ असा की विमोक्ष म्हणजे अक्षय सुख हे जीवनाचे अंतिम ध्येय आहे. ते प्राप्त करून देण्यास विद्या किंवा शिक्षण समर्थ आहे. शिक्षणाने व ज्ञानाने व्यक्तीला मनुष्यपण येते. तिचा आणि समाजाचा उत्कर्ष शिक्षणाने होतो. सुसंस्कृत आणि अभिरूचीपूर्ण जीवन जगण्याचे सामर्थ्य शिक्षणानेच मिळते. नवनिर्मितीला वाव मिळतो आणि अनेक सुप्त गुण प्रकट होऊ लागतात.प्रतिभा, प्रज्ञा यांना नवनवे उन्मेष फुटतात आणि समाजाची प्रगती सतत होत रहाते. माणूस हा जन्मभर शिक्षण घेतच असतो. एखादी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीपेक्षा श्रेष्ठ ठरते ती त्याला दुसऱ्यापेक्षा एखादा अवयव जास्त असतो म्हणून नव्हे तर त्याचे मन आणि बुद्धी ही शिक्षणाने प्रगत व विकसित झालेली असते म्हणून.

प्राचीन भारतीय लोकांनी त्यांच्या काळाला अनुसरून शिक्षणाचे काही उद्देश मानले. विद्यार्थ्यांच्या मनात पावित्र्य आणि धार्मिकता यांची भावना निर्माण करणे, चारित्र्य संवर्धन करणे त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास करणे, त्यांना सामाजिक जबाबदारीची आणि कर्तव्यांची जाणीव करून देणे, तसेच राष्ट्रीय संस्कृतीची वृद्धी व प्रसार करणे हे शिक्षणाचे मुख्य उद्देश प्राचीन आचार्यांनी मानले. शिक्षणक्रमात वैदिक वाङमयाबरोबरच धंदेशिक्षण व ललितकलांचे शिक्षण देत कला, उद्योगधंदे, व्यापार इत्यादी विषयांच्या शिक्षणासाठी विद्यार्थी एखाद्या कुशल कारागीराकडे जात असत. थोडक्यात गुरूकुल पद्धती ही अत्यंत प्रभावीपणे कमी वेळात योग्य वयात संस्कार करण्याची पद्धत होती.

'असतो मा सद्गमय। तमसो मा ज्योतिर्गमय। मृत्योर्मा अमृतम् गमय।'

म्हणजेच अंधारातून प्रकाशाकडे जाण्यासाठी, असत्यातून सत्याकडे जाण्यासाठी, मृत्यूपासून शाश्वत तत्त्वाकडे घेऊन जाण्यासाठी शिक्षणाची नितांत आवश्यकता आहे. पण सध्या शिक्षणातून वरील बोधवाक्याचा पाठपुरावा तर होतच नाही. अगदी टोकाचाच शिक्षणाने विचार होतो आहे असे वाटते. शिक्षणाविषयी निरनिराळ्या तत्त्ववेत्त्यांनी निरनिराळी तत्त्वे मांडली पण ही तत्त्वे व तत्वप्रणाली केवळ पुस्तकात किंवा ग्रंथातच शोभनीय म्हणून राहिली. आज सर्वसामान्य व्यक्ती शिक्षणातून ज्या अपेक्षा धरते, त्या पूर्ण होत नाहीत म्हणूनच शिक्षण हे निरर्थक आहे असेच वाटते. शिक्षण घेणे म्हणजे पदवी प्राप्त करणे. अशा आशयाची संकुचित वृत्ती किंवा कल्पना सर्वत्र फैलावलेली दिसते. केवळ पदव्यांची लांबलचक शेपूट लावून या शेपटीच्या नावाने कोणाही व्यक्तीला समर्थपणे जीवन जगता येत नाही. सर्वसामान्यपणे पदवी घेणे व त्या पदवीच्या आधारे जीवन जगणे हाच शिक्षण घेण्याचा अर्थ मानला जातो. "The fruit of education is not learning but to develop desires and capacities." हे वाक्य शिक्षणाची सर्वांना समजणारी कल्पनाच स्पष्ट करते पण सध्या याच्या उलट स्थिती दिसते.

आचार्य विनोवा भावे आपल्या एका पुस्तकात शिक्षण कसे हवे? हे सांगताना म्हणतात 'आज ब्रह्मविद्या शिकत असतानाच विद्यार्थ्यांना धंदे शिक्षणातही तरबेज करायला हवे' पण दुर्दैवाने कष्टाला, श्रमाला प्राधान्य मिळत नाही. स्वामी विवेकानंद म्हणतात, "Todays Education is all wrong. Mind is crammed with facts, before it is taught how to think. Mind control should be taught first. If I had to go through it once again, I would learn to control my mind first and then decide which facts I should gather."

या विचारवंतांनी सुसंस्कारित मनासच प्राधान्य दिले आहे. आजची शिक्षण पद्धती व शिक्षणक्रम हा संस्कार देणारा नसून फक्त माहिती देणारा आहे. माहितीचा अनावश्यक कचरा डोक्यात भरण्याची व्यवस्था म्हणजे आजचे शिक्षण. ते फक्त साक्षर निर्माण करते, सुसंस्कारित नागरिक निर्माण करू शकत नाहीत. संस्कारित माणूस हा विपरित परिस्थितीतही बिघडत नाही, पण तो जर केवळ साक्षर असेल तर त्याला संधी मिळताच त्याचा राक्षस होतो.

आजचे शिक्षण केवळ पोटार्थी तयार करणारे. ज्ञानी विद्यार्थी तयार करणारे नाही. शिक्षण घेताना त्याचे ओझेच आजच्या विद्यार्थ्याला जाणवते. शिक्षणातून काही आनंद मिळतो असे आजच्या विद्यार्थ्याकडे पाहून वाटत नाही. दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या अभ्यासाच्या बह्या पुस्तकांच्या ओझ्याखाली तो दबला जातो आहे. कर्तव्य म्हणून शाळेत जायचे. अभ्यासक्रम कठीण म्हणून क्लासला जायचे, घरी आल्यावर गृहपाठ. या चक्रात आजचा विद्यार्थी अडकला आहे. त्यामुळे तो रसरसलेला दिसत नाही. मेंदूइतके हृदयाला प्राधान्य नाही. मला आठवते ते एका मासिकाचे मुखपृष्ठ त्यात एक पिठाची गिरणी दाखवली होती त्यावर लिहिले होते 'शाळा'. त्यात घातले जाणारे धान्य म्हणजे 'विद्यार्थी' बाहेर पडणारे पीठ म्हणजे 'कारकून'. आजच्या शिक्षण पद्धतीचे किती बोलके चित्र आजचे शिक्षण spoon feeding करण्यासारखे. शिक्षकांनी जेवढे सांगितले तेवढेच पाठ करा आणि परीक्षेत उतरावा म्हणजेच 'घोका आणि ओका'. विद्यार्थ्यांच्या स्वतःच्या बुद्धीला वाव नाही. स्मरणशक्तीला भरपूर वाव. त्यामुळे ज्याची स्मरणशक्ती तल्लख तो विद्यार्थी ९०%च्या वर गुण मिळवतो. पण बाकीचे मात्र जेमतेम ५०% किंवा त्याहीपेक्षा कमी गुण मिळवताना दिसतात. सुसंस्कारित मन नाही. त्यामुळे शुद्ध चित्ताअभावी कुशाग्र बुद्धीही विध्वंसाकडे नेते. Sharp intellect in the absence of purity of heart leads to disasters. हे वाक्य प्रसिद्धच आहे. आजही कित्येक भावनाशून्य माणसे सभोवती दिसतात.

चांगला समाज हा चांगल्या शिक्षणाचा परिणाम आहे. शिक्षण जसे असेल तसाच समाज निर्माण होत असतो. या पार्श्वभूमीवर आजचे शिक्षण पाहता कुठलाही सामान्य कुवतीचा माणूसही सांगेल की शिक्षण पद्धतीत काहीतरी चूक आहे. 'कायदा पाळा गतीचा, काळ मागे लागला, थांबला तो संपला' या उक्तीप्रमाणे काळाबरोबर शिक्षण बदलणे स्वाभाविक पण ते बदलताना परिस्थितीचाही विचार हवा तसेच सामान्य विद्यार्थ्यांचाही विचार हवा. शिक्षणातून माणूस शहाणपणा शिकतो. त्यातून जो अनुभव येतो त्यामुळे तो आपल्या वागण्यात इष्ट असा बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करतो. अनुभवातून, प्रयत्नातून तो शिकलेल्या गोष्टीचा व्यवहारात उपयोग करतो. त्यामुळे त्याला चांगली सवय लागून पक्का संस्कार होतो. शिक्षणातून संस्कार व्हावेत. त्यामुळे चांगली तत्त्वे समजतात, चांगले वळण लागते, चांगली मूल्ये निश्चित करता येतात. त्यातूनच समाजाची, राष्ट्राची संस्कृती घडते. दुर्दैवाने आज आपली संस्कृती आपली रहात नाही असे दिसते. पाश्चात्त्यांचे अंधानुकरण होत आहे. संस्कृती टिकविण्यासाठी शाळेत संस्कारयुक्त मूल्य शिक्षण हवे.

चांगले संस्कार आत्मसात करणे ते आपल्या वर्तनात उतरवणे म्हणजेच संस्कारयुक्त मूल्य शिक्षण. मूल्ये वेगवेगळ्या प्रकारची. बौद्धिक मूल्ये-ही विज्ञाननिष्ठ-यात तर्क वितर्क महत्त्वाचा. भावनानिष्ठ मूल्ये - हे घर माझे, ही शाळा माझी, हा देश माझा ही भावनिक मूल्ये. समाजमूल्ये म्हणजे समाजाच्या प्रगतीसाठीची मूल्ये. काही वेळा वैयक्तिक हित बाजूला ठेवून सामाजिक हिताला महत्त्व दिले जाते. सौंदर्य विषयक मूल्ये शिकताना कलांचा आस्वाद घेण्याची प्रत्येकाची प्रवृत्ती असते. पण दुर्दैवाने आज 'कलेचे' 'कलेवर' व्हायची वेळ आली आहे. अभ्यासक्रमातून कला या विषयाचे उच्चाटन करण्याचे प्रयत्न चाललेले दिसतात. वास्तविक कला माणूस घडवते, बिघडवत नाही. पण आज सर्वांना आपला पाल्य, हा डॉक्टर, इंजिनिअर, शास्त्रज्ञच व्हायला हवा आहे. पण त्यांच्यातला माणूस घडवणारी कला नको आहे. मानवी मनाचा व्यापार समजण्यासाठी कलेइतके दुसरे प्रभावी साधन नाही. सौंदर्याचा संबंध आनंदाशी असतो. पण आज हा आनंदच हिरावून घेतला जात आहे.

शाळा ही शत्रू, शिक्षक हे हाडवैरी व पुस्तके म्हणजे रद्दी असे विद्यार्थ्यांना वाटू नये. शैशव हे श्रमाने, स्वबळाने, स्वयंस्फूर्तीने फुलायला हवे तर त्या शैशवावर बहरदार तारूण्य उमलते. शैशवावस्थेत झालेले सूक्ष्मतर संस्कार बीजावस्थेत पेरले जातात व पुढील आयुष्यात जशी संधी व उपलब्धी प्राप्त होते तसे बीजाचे अंकुरण जोमाने घडून विशाल व्यक्तिमत्त्वाची पायाभरणी होते. आजच्या या केवळ माहिती देणाऱ्या अभ्यासक्रमामुळे स्वतंत्र विचारसरणी, शिक्षणाची तीव्र आस, सर्व संग्राहकता वृत्ती विद्यार्थ्यांत दिसत नाही. नवा अभ्यासक्रम हा विद्यार्थ्यांना अवांतर वाचनास प्रवृत्त करणारा हवा. त्यामुळे त्यांच्या बुद्धीला खाद्य मिळेल व ते केवळ पोटार्थी, परीक्षार्थी बनणार नाहीत.

म्हणून नव्या अभ्यासक्रमात प्रचीन व अर्वाचीन विषयांची (अभ्यासक्रमाची)सांगड हवी. तो हवाहवासा वाटणारा अभ्यास हवा.

सौ. मंजिरी दांडेकर
कला शिक्षिका,
डॉ. बेडेकर विद्या मंदिर,
नौपाडा, ठाणे.

•••

With Best Compliments
from

A
WELL
WISHER

# मी कोण आहे?

**श्री. अनिल शाळीग्राम**

*माणसाला सनातन काळापासून पडलेला हा प्रश्न आहे. या प्रश्नाच्या निमित्ताने चोखंदळ वाचक व संगणक या विषयाचे अभ्यासक श्री. शाळीग्राम यांनी विज्ञानाच्या दृष्टिकोनातून केलेल्या चिकित्सेवर हा लेख आधारित आहे. या लेखातून गूढ अशा काही मुद्यांवर त्यांनी विचार व्यक्त केले आहेत. हे विचार करण्याची एक वेगळी दिशा आपल्याला देऊ शकतात. -संपादक*

माणूस जेव्हापासून विचार करू लागला तेव्हापासून त्याला प्रश्न पडला की, मी कोण आहे? या प्रश्नाचे उत्तर वेगवेगळ्या तत्त्ववेत्यांनी आणि तत्त्वज्ञांनी द्यायचा प्रयत्न केला आहे. पण कोणतेही उत्तर सर्वमान्य झाल्याचा किंवा पूर्ण समाधानकारक असल्याचा दावा कोणी करू शकत नाही.

नेहमी असं मानलं गेलं की विज्ञान हे भोगवादावर आधारित आहे आणि अशा प्रकारच्या तात्त्विक चर्चा करण्याच्या लायकीचे नाही, किंवा अशा प्रकारच्या चर्चा विज्ञानाच्या सीमांमध्ये होऊ शकत नाहीत.

पण आधुनिक विज्ञानाच्या सर्व दिशा या मूलभूत तात्त्विक मुद्यांकडे नेणाऱ्या आहेत. विज्ञानाला मूळ प्रश्नांची उत्तरं मिळाली नसली तरी आधुनिक विज्ञानाने या दिशेने मोठीच प्रगती केली आहे.

जीवशास्त्रातील जनुकांचा शोध ही अशीच एक दिशा आहे. या शोधामुळे सजीवाच्या पेशींमधील जनुके आणि रंगसूत्रे यांची जडणघडण लक्षात आली आणि त्यामुळे सजीवांची जडण घडण कशी झाली याचा उलगडा होऊ शकला. डार्विनच्या उत्क्रांतीवादनंतरची ही एक मोठी झेप होती. या शोधामुळे जीवशास्त्राचा रासायनिक प्रक्रियांच्या दृष्टीने उलगडा झाला आणि जीवशास्त्रातील रसायनशास्त्राचा पाया स्पष्ट झाला. आता येणाऱ्या एकविसाव्या शतकात जनुकशास्त्र हे अतिशय महत्त्वाचं शास्त्र असणार आहे असं मानलं जातं. संगणक युग संपल्यावर पुढील युग जनुकशास्त्राचं युग असेल असं मानलं जातं. कारण जनुकशास्त्रामुळे आपण सजीवाच्या प्रत्यक्ष उत्क्रांतीच्याच प्रक्रियेला हात घालणार आहोत.

### विश्वरचना शास्त्र

मूलभूत तात्त्विक मुद्यांकडे नेणारी दुसरी दिशा म्हणजे विश्वरचनाशास्त्र. आतापर्यंत असा समज होता की विश्वाची उत्पत्ती आणि लय या गोष्टींची तत्त्वज्ञानातच चर्चा होऊ शकते आणि या गोष्टी विज्ञानाच्या पलीकडे आहेत. पण आईनस्टाईनच्या सापेक्षतावादापासून विश्वरचनाशास्त्राला चांगलीच गती मिळाली असून आता विश्वरचना, विश्वाची उत्पत्ती आणि लय यांच्याबद्दल गणिती भाषेत अत्यंत काटेकोर सिद्धांत उपलब्ध आहेत. विश्व हे प्रसरणशील आहे, ते एका अतिमहास्फोटाने निर्माण झाले. असा एक विशेष लोकप्रिय सिद्धांत आहे. ज्या वेळी हा स्फोट सुरु झाला तेव्हा सर्व विश्व एका बिंदूत सामावलेले होते. स्फोट होताच प्रथम अवकाशाचा विस्तार सुरू झाला. सुरवातील सर्व विश्वभर प्रचंड तापमान होते, सर्व वस्तुमान प्रकांड शक्तीच्या स्वरूपात सर्व अवकाशभर सारखे पसरलेली होते. ही सर्व परिस्थिती पहिल्या सेकंदाच्या सुरुवातीच्या काळात होती. पहिला सेकंद पूर्ण होण्याआधीच विश्वाचा मोठा विस्तार झाला होता. तापमान कमी झाले होते. शक्तीतून पदार्थ तयार होण्याची प्रक्रिया सुरू झाली होती. याचा अर्थ या महास्फोटाची सुरुवात हीच प्रत्यक्ष काळ, अवकाश, शक्ती आणि पदार्थ यांची देखील सुरुवात होती. यानंतर

हळूहळू तारे, आकाशगंगा यांची निर्मिती झाली. आज देखील अवकाशाच्या पोकळीत नवे तारे, नव्या आकाशगंगा यांची निर्मिती चालूच आहे. तारे आणि आकाशगंगा यांच्या बरोबर जड मूलद्रव्यांची उत्पत्ती, त्यातून सजीवांची उत्पत्ती असा क्रम लावता येईल. आणखी अशी एक शक्यता आहे की आपल्या विश्वाप्रमाणे आणखी विश्वे असू शकतील. पण त्यांचा आपला संपर्क होणे आज तरी अशक्य वाटते. विश्वाच्या उत्क्रांतीच्या एका टप्प्यावर सजीवाची उत्पत्ती होणे ही घटनादेखील अपरिहार्य वाटते. म्हणजे सजीव आणि त्यातून निर्माण होणारी जाणीव विश्वाच्या उत्क्रांतीचा अविभाज्य भाग असावा काय? त्याचप्रमाणे विश्वात इतरत्र जवसृष्टी असण्याची शक्यता बरीच वाटते.

**संगणक तंत्रज्ञान**

मूलभूत तात्त्विक मुद्यांकडे नेणारी आणखी एक दिशा म्हणजे संगणकीय तंत्रज्ञान. संगणक हे एक असं यंत्र आहे की जे मानवी मेंदूतील यांत्रिक प्रक्रियांची अभ्यास करून बनवलेलं असतं. यातून प्रश्न असा निर्माण झाला की मानवी मेंदूचं काम करणारा हा उद्या मानवी मेंदूची जागा तर घेणार नाही ना? सर रॉजर पेन रोज या शास्त्रज्ञाने याच असं उत्तर दिल की, आज संगणकीय तंत्रज्ञान ज्या पायावर उभं आहे त्या आधारे तयार करण्यात आलेले संगणक मानवी मेंदूची जागा घेण्यास असमर्थ आहेत. पण आजचे संगणक देखील जागतिक बुद्धीबळ विजेत्या गॅरी कॅस्परॉवला आणि आनंदला हरवू लागले आहेत ! दुसरं म्हणजे उद्या नवीन प्रकारच्या तंत्रज्ञानावर आधारित संगणकात जाणीवांचे गुण कशावरून येणार नाहीत. ? तर तशी शक्यता नाकारता येणार नाही. सध्या मानवी मेंदूच्या पेशींचा अभ्यास करून त्यावर आधारित कृत्रिम बुद्धिमत्तेचे प्रयोग चालले आहेत आणि ते बरेचसे यशस्वी होत आहेत. सध्या माणसाला त्यापासून धोका नाही, उलट मानवी बुद्धिमत्तेचे आणि जाणीवांचे गूढ उकलण्यास ते सहाय्यभूत होऊ शकतील.

**विज्ञानाच्या या सर्व दिशा 'मी कोण आहे' या प्रश्नाच्या उत्तराकडे नेणाऱ्या आहेत.**

**मरणाच्या दारी**

'मी कोण आहे?' याचं शास्त्रीय उत्तर शोधण्यासाठी आणखी काही दिशांनी संशोधन चालू आहे, ते उत्कंठा वाढवणारं आहे. जेव्हा माणूस मरणाच्या दारी असतो तेव्हा त्याला काही विलक्षण अनुभव येत असतात. आपण एखाद्या बोगद्यातून जात आहोत आणि मध्यभागी प्रकाशमान वर्तुळ आहे. ते केंद्रभागी खूपच प्रखर आहे. वगैरे . दुसऱ्या प्रकारचे अनुभव म्हणजे मरणासन्न अवस्थेत एखादी व्यक्ती पडलेली आहे. अशा वेळी त्या व्यक्तीला असं जाणवू लागत की आपण आपल्या शरीरातून बाहेर पडलो आहोत. आपण तरंगत असून आपल्याच शरीराकडे पाहात आहोत, वगैरे.

आतापर्यंत विज्ञाननिष्ठांकडून अशा प्रकारच्या अनुभवांची हेटाळणी केली जायची आणि अध्यात्मवाद्यांकडून अतिभौतिक अस्तित्वाचा पुरावा म्हणून या अनुभवांचे दाखले दिले जायचे. जेव्हा शास्त्रीय पद्धतीने आणि गंभीरपणे या अनुभवांची छाननी करण्यात आली तेव्हा असं लक्षात आलं आहे की मरणासन्न अवस्थेत माणसाच्या मेंदूला प्राणवायूचा पुरवठा अपुरा पडतो. त्याचवेळी माणसाची बाह्य संदेश ग्रहण करणारी पंचेंद्रिये शिथिल तरी पडलेली असतात किंवा काम तरी करीत नसतात. सामान्य परिस्थितीत एरवी डोळ्यात पडणारे किरण डोळ्याच्या पडद्यावर बाह्य जगाचं प्रतिबिंब उमटवत असतात. पुढे हे संदेश मेंदूच्या विशिष्ट भागात जाऊन त्याचं मेंदूत विश्लेषण करण्यात येऊन या प्रतिबिंबाचा अर्थ लावला जातो. मरणासन्न अवस्थे बाह्य जगाचे प्रतिबिंब प्रत्यक्षात डोळ्याच्या पडद्यावर पडतच नसते. कारण पंचेंद्रियेच निष्क्रिय झालेली असतात, तेव्हा प्राणवायूच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे डोळ्यातील पडद्या उद्दिपीत होऊन मेंदूकडे संदेश पाठवण्याचं काम मात्र करतच राहातो. शास्त्रज्ञांनी

डोळ्याच्या अंतर्गत आकाराचा अभ्यास केला आणि संगणकीय कार्यक्रमांच्या द्वारा संगणकाला डोळ्यात घडणारी कृती करण्यास भाग पाडलं. आणि काय आश्चर्य संगणकाच्या पडद्यावर तसाच काळा बोगदा, त्यामध्ये तशाच प्रकारचे प्रकाशमान तेजोवलय आणि मध्यभागी प्रकाशमान केंद्र निर्माण झालं ! म्हणजे मरणासन्न अवस्थेत दिसणाऱ्या गोष्टी म्हटलं तर त्या व्यक्तीच्या खऱ्या खुऱ्या अनुभूती होत्या आणि म्हटलं तर भास होते. कारण ते बाह्य जगातून प्रत्यक्ष निर्माण झालेले नव्हते.

### मानवी मेंदू

यातून बरेच प्रश्न निर्माण होतात. वास्तव म्हणजे काय आहे? भ्रम कशाला म्हणायचं आणि सत्य कशाला म्हणायचं? मानवी मेंदू एखादी गोष्ट सत्य आहे की भ्रामक आहे हे अजमावू शकतो असं आपण म्हणतो. पण अगदी काटेकोरपणे बघायचं झालं तर वास्तव हे वास्तव आहे की नाही हे कोणीच कधीच सिद्ध करू शकणार नाही. आणि ते वास्तव नाही तर भ्रामक आहे असंही कोणी कधी सिद्ध करू शकणार नाही ! यावरून लक्षात येईल की वास्तव आपण त्याला मानतो की ज्याचा आपण परत परत अनुभव घेऊ शकतो आणि जे संतुलित असतं. मरणासन्न अवस्थेत जेव्हा त्या व्यक्तीसाठी सर्व जगच अस्थिर आणि क्षणभंगुर झालेलं असतं त्यावेळी, त्याक्षणी हा वरील भ्रामक अनुभव मात्र त्या व्यक्तीला सर्वात संतुलित आणि स्थिर स्वरूपाचा असतो. त्यामुळे त्या व्यक्तीसाठी त्याक्षणी तो अनुभव खरा असतो ! आपल्या शरीरातून बाहेर पडून आपल्याचकडे त्रयस्थपणे बघण्याचा अनुभवदेखील अशाच प्रकारे त्या व्यक्तीसाठी अत्यंत अस्सल आणि सत्य असतो. अशा प्रकारचे आणखी काही अनुभव म्हणजे या व्यक्तींना प्रिय असलेल्या मृत व्यक्ती भेटणं वगैरे. याबाबत असं लक्षात आलं की मोठ्या वयाच्या व्यक्तींनाच अशा प्रकारचे अनुभव आले. पण लहान मुलांना मृत व्यक्ती भेटल्याचे अनुभव येत नाहीत. कारण त्यांच्या स्वतःच्या अनुभवातच मृत व्यक्ती विशेष नसतात.

यातून पुढे जाऊन असं लक्षात आलं की मरणाच्या दारात जाऊन परत आलेल्यांमध्ये अनेकांच्या स्वभावात, विचारसरणीत, एकूण जगाकडे बघण्याच्या दृष्टिकोनात बरेच वेळा विलक्षण बदल घडतात. याचं कारण असं असू शकतं की बरेच वेळा आपण 'बन चुके' असतो. म्हणजे आपलाच आपल्या स्वतःतील बदलाला प्रचंड विरोध असतो. स्वतःमध्ये बदल करणं म्हणजे स्वतःचा नाश करणं असत आपण समजत असतो. पण जेव्हा एखादी व्यक्ती मरणाला सामोरी जाते तेव्हा त्या व्यक्तीला आपल्या 'स्वत्वा'ची प्रचंड अस्थिरता आणि शेवट दिसतो. 'स्वत्व'ला प्रचंड ठोकर बसते. जर अशी व्यक्ती मरणाच्या दारातून परत आली तर स्वतःकडे, म्हणजे पर्यायाने जगाकडे, वेगळ्याच नजरेने पाहू लागते. त्यामुळे अशा व्यक्तीत बदल घडू शकतात.

या सर्व विश्लेषणातून 'जाणीव' म्हणजे काय याचा पूर्ण अर्थ समजू शकला नाही तरी काही धागेदोरे मिळू शकतात. आपल्याला आपल्या आजूबाजूच्या जगाचे, म्हणजे वस्तूंचे, नाते संबंधांचे, घटनांचे, कल्पनांचे, नीतीमूल्यांचे अनेक अनुभव येत असतात. यापैकी काही अनुभव आपल्या दृष्टीने भ्रामक असतात. त्यांना आपण बाजूला सारतो. जे अनुभव स्थिर आणि परत परत येणारे असतात ते आपण सत्य म्हणून निवडतो. एकाच गोष्टीचे अनेक प्रकारचे, अनेक पदरी सत्य अनुभव मी 'माझा' म्हणून निवडलेला असतो. जगात वावरताना अगणित वास्तव आणि काल्पनिक वस्तूंच्या अशा प्रकारे निवड केलेल्या 'माझ्या' अनुभवांच्या, निष्कर्षांच्या, ठोकताळ्यांच्या गोळाबेरजेस 'जाणीव' म्हणता येईल का?

माझ्या मते 'मी कोण आहे' या विषयाच्या पुढील संशोधनासाठी ही व्याख्या उपयुक्त ठरू शकेल.

**श्री. अनिल शाळीग्राम**
जुन्या महापालिकेसमोर,
बाजार रस्ता, ठाणे ४०० ६०१.

• • •

# सहनसिद्धी

**अरविंद दोडे**

> *राग यायला फार अकल लागते असंही नाही. मात्र ते गिळायला साधनाच करावी लागते. या एका वेगळ्या विषयावरील अभ्यासक श्री. अरविंद दोडे यांचा अध्यात्मावरील हा ललित लेख - संपादक*

सहनशीलतेचं फूल हे काही प्रत्येक बागेत फुलत नाही, हे जरी खरं असलं तरी ते रोपटं आपल्या मनात लावणं अशक्य नसतं. ते फूल दुःखावर फिरवलं की वेदना कमी होतात. त्या फुलाचा गंध सुरक्षितपणा देतो. सहनशीलतेच्या फुलातून मधुर फळ आकार घेतं समाधानाचं. हे फळ निराशेनं खाल्लं की जिवंत रहाणं अशक्य! हे फळ ज्याच्याजवळ असतं, तो सर्वांत श्रीमंत. या फळाच्या अतिसेवनानं माणूस एक तर तत्वज्ञ होतो किंवा जहरी...

सारं काही सहन करण्याचं बळ ज्याच्या अंगी असतं त्याला 'सहनसिद्धी' प्राप्त झाली असं समजावं का?

'ते प्रथम जाण बुद्धी।
मग ज्ञान जे निरवधि।
असंमोह सहनसिद्धी।
क्षमा सत्य॥'

असं ज्ञानोबारायांनी म्हटलंय. अर्थ असा की, भिन्न भिन्न विकार प्रत्येक प्राण्यात त्याच्या प्रकृतीप्रमाणे बनून संपूर्ण त्रैलोक्यात पसरले आहेत. निरनिराळे भावही त्या परमेश्वरापासूनच निर्माण होतात. त्यापैकी पहिली बुद्धी. नंतर अगाध ज्ञान, असंमोह-सहज उपस्थित झालेल्या ज्ञेय गोष्टींकडे विवेकपूर्वक प्रवृती-सहन करण्याचा स्वभाव म्हणजे क्षमा आणि सत्य ही समजावीत.

जगताना मनाचा आणि इंद्रियांचा निग्रह कसा करायचा? हा प्रश्न सुटतोच असं नाही. त्यामुळे सुख-दुखांच्या सीमारेषेवर झुलणारं मन मरेपर्यंत अधांतरी झुलंतच राहतं! कारण काय? तर-

'जन्म दुःखाचा अंकुर।
जन्म शोकाचा सागर।
जन्म भयाचा डोंगर।
चळेना ऐसा॥'

असा हा मनुष्यजन्म. त्यातून सहनशीलता वाढवायची म्हणजे कठीणच. आपल्याला तर पावलोपावली सतत रागच येत असतो. नळाला पाणी आलं नाही, वेळेवर गाडी मिळाली नाही, सणावाराला कपडालत्ता नाही, सुट्टीत प्रवास नाही... अशी एक ना दोन, असंख्य कारणे, राग यायला फार अकल लागते असंही नाही. मात्र गिळायला साधनाच करावी लागते. महर्षी जमदग्नीच उदाहरण इथं देण्यासरखं आहे. त्यांनी रेणुका देवीचा शिरच्छेद करायला पुत्र परशुरामाला सांगितलं. त्यानं पितृआज्ञा पाळली. वडिलांनी खूष होऊन म्हटलं,'बोल काय पाहिजे?' तो म्हणाला, 'मला आई हवीय.' अर्थात रेणुकेस पुन्हा जिवंत केलं त्यांनी. 'दुसरा वर माग' म्हटल्यावर परशुरामानं विनवलं,'क्रोधाचा तुम्ही त्याग करा.' त्यांनी क्रोधावर पाणी सोडलं!

तेव्हा क्रोधानं हात जोडून काय विनवल? तो म्हणाला, 'महर्षी मी थोरांकडेच शोभून दिसतो. तुम्ही त्याग

केला तर कुठं आश्रय शोधू ?'

परशुरामानं मध्येच म्हटलं,

'माझ्याकडे रहा!'

अशाप्रकारे क्रोध सामान्यांकडे न जाता असामान्यांकडेच राहणं पसंत करतो... कारण, क्रोधाचं तेज आपल्यासारख्या सामान्यांना सहन होत नाही. म्हणून आपण सहन करण्याची सिद्धी प्राप्त करून घ्यावी. दुसऱ्यांनी क्षमा करण्याचा स्वभाव घडवणं म्हणजे रागावर मात करणं. क्रोधावर विजय मिळवणं हेच तर जमत नाही. कारण 'अहंकार' नावाचा एक राक्षस आपल्याला तसं करू देत नाही.

'जन्म जिवाचं मीपण।

जन्म अहंतेचा गुण।

जन्म हेचि विस्मरण।

ईश्वराचे॥'

'मी' 'मी' करायचं अन् देवाला विसरायचं. हेच जीवाचं बंधन. अशा या लोभाच्या कमळात अडकून पडल्यानं कुठलीच सिद्धी प्राप्त होत नाही. दया नाही, क्षमा नाही, म्हणून शांती नाही. हेच आनंदाला आडवे येणारं विघ्न आहे. संतांच्या सहनशीलतेची अनेक उदाहरणं आपणास ठाऊक असतात. याबाबतीत महम्मद पैगंबराचं उदाहरण उत्तम आहे. त्यांच्या गल्लीतला एक इसम त्यांना रोज शिव्या देत असे. हजरत त्या निमूटपणे सहन करीत. दोनतीन दिवस तो न दिसल्यानं हजरत त्याच्या घरी गेले. तो आजारी होता. त्यांना पाहून तो शरमला. रडू लागला. क्षमा मागितली त्यानं. तेव्हा हजरत म्हणाले,

'तुझ्यासारखी माणसं आमच्यासारख्यांची परीक्षा पाहतात.'

हे आपल्यात यायला हवं असतं. पण येत नाही. आपण कुठल्याही रांगेत भांडतो. मारामाऱ्या करतो. कारण त्याशिवाय नंबर लागतनाही. गप्प राहायचं म्हटलं तर? जगाच्या मागेच पडणार! म्हणून सुवर्णमध्य साधायचा. अन्यायाविरूद्ध पेटून उठावं हे खरं, पण त्या आगीत कुणी अन्यायानं जळणार तर नाही ना? ही दक्षता घ्यावीच लागते. इतरेजन परीक्षा पाहतात. त्यांच्या परीक्षेत उत्तीर्ण होणं, हीच आपली साधना... आणि साधनेचा आनंद हा अलंकाराप्रमाणे भूषणभूत असतो. जगण्यासाठी साधना करा अथवा साधनेसाठी जगा. ही सहनसिद्धीच आपल्याला सिद्धत्व देते. ते कुणालाही हवंच असतं, नाही का? अर्थात सिद्धत्व इतकं सोपं नसतं. जन्मोजन्मीची साधनाही अपुरी पडते. तरीही सिद्धीच्या क्षुद्रपणाबद्दल संतांनी तुच्छतेनं काय म्हटलंय -

'जैसे वेश्येचे हावभाव।
तैसे ऋद्धिसिद्धीचे वैभव॥'

कुणीही सहज भुलावं, हरवून जावं, मायामोहात गुंतून पडावं, जन्माची साधना क्षणात नष्ट व्हावी अशी असते सिद्धीची जादू! म्हणून तिला टाळावं. पण सद्‌गुणांची सिद्धी मात्र पुजावी. तीच शांती, आनंद, संतोष देते. साधक सिद्धी आणि बाधक सिद्धी यांच्यातला फरक समजून घ्यावा. भगवंतानं साधनमार्गावर अनेक आमिषं पेरलेली आहेत - सिद्धीच्या रूपानं त्या आमिषांना भुलून त्यांच्यात गुंतून पडल्यावर साधक तिथंच थांबतो. कारण त्या सिद्धींना जग भुलतं. चमत्काराला नमस्कार करतं. आपलं काम व्हावं म्हणून दुसरी माणसं आपल्याला 'नजराणे' पाठवतात. ते घ्यावेत की नाहीत, हे देणाऱ्याच्या हेतूंवर अवलंबून असतं. एवढा विवेक असायला हवाच. भाकरीचा चंद्र शोधण्यात जिन्दगी बरबाद होतच असते. 'भुकेली माणसं म्हणजे रूद्राचे अवतार'... असं सायणाचार्यांनी म्हटलयं. 'अन्न आच्छादन। हे तो प्रारब्धाधीन॥' असं मानलं तरी कष्ट उपसावे लागतातच त्यासाठी... त्यासाठी 'इंद्रियांची होळी।

संसार दिला बळी॥' इतकी अलिप्तता लागते अंगी. ही तटस्थता बाणण्यासाठीच हवी असते सहनसिद्धी! जिथून निघावं, तिथंच भटकत भटकत येऊन पोहचावं - तशी ही ज्ञानाची गंमत असते ! कुठल्याही विभूतीच्या चिंतनाची रीत हीच असते. चराचरातील परमेश्वराचं दर्शन घेण्याची असीम उत्कटता मात्र हवी !

मानवी जीवनात सामान्य मनुष्याच्या अंगी ज्या अनेक शक्ती मर्यादित स्वरूपात आढळतात, त्या मर्यादेपलीकडे वाढल्या म्हणजे त्यांना सिद्धी म्हणतात. त्यांचे प्रकार अनेक आहेत. सूक्ष्म होणं, गुरुत्व पावणं म्हणजे मोठं होणं, अदृश्य होणं, परकाया प्रवेश करणं, वाचासिद्धी, भूत-भविष्य-वर्तमानाची माहिती असणं, सर्वत्र संचार करणं... किती म्हणून सांगाव्यात? पण खरी सिद्धी एकच ! समर्थांनी त्याबद्दल काय म्हटलंय, पहा -

'दुसऱ्यांचे अभिष्ट जाणावे।
बहुतांचे बहुत सोसावे।
न सोसे तरी जावे।
दिगंतराप्रती॥
दुसऱ्याचे दुःख जाणावे।
ऐकून तरी वाटून घ्यावे।
बरे वाईट सोसावे।
समुदायाचे॥

दुसऱ्याचं हित कशात आहे ते जाणावं. अनेकांचे अनेक प्रकारचे त्रास सहन करावे. सहन करणं अशक्य असल्यास दूर निघून जावे, दुसऱ्याचं दुःख ओळखावं. ते दूर करावं. हळहळावं. ते ऐकून घ्यावं. एकंदर आपल्या आणि परक्या माणसाचं बरं वाईट सहन करावं... उपदेश सोपा आहे, पण हे सारं आचरणात आणताना केवढ्या यातना होतात ! अगदी अशक्य वाटतं सारं... दुसऱ्याचं दुःख सोसल्यावाचून माणसं जोडता येत नाहीत, हे जरी खरं असलं तरी खूपच सहनशीलता दाखवली तर आपलं महत्त्वही रहात नाही, त्याचं काय? या प्रश्नाचं युक्त उत्तरही संतांनी देऊन ठेवलंय -

'लोक पारखून सांडावे।
राजकारणे अभिमान झाडावे।
पुन्हा मेळवून घ्यावे।
दुरिल्या दोरे॥'

परस्पर काटा काढावा, त्यास तोडू नये. हे समजलं की, जीवन सुसह्य झालंच म्हणून समजावं ! सहनशीलतेचं फूल आपल्या मनाच्या वृंदावनात फुलायला उशीर कसला ?

**श्री. अरविंद दोंडे**
शालन भोईर वाडी, खोपट, ठाणे - ४०० ६०१.

•••

*With Best Compliments*
*from*

A
WELL
WISHER

# आदरणीय प्राध्यापकहो...

**श्री. अजित जोशी**

*कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांचा संप ही गत वर्षीच्या शैक्षणिक वर्षातील एक घटना. गत वर्षी कनिष्ठ महाविद्यालयात असणाऱ्या एका विद्यार्थ्याला या संपाबद्दल काय वाटले, ते या लेखातून व्यक्त झाले आहे. विद्यार्थ्यांच्या विचारक्षमतेचा एक वेगळा आविष्कार या दृष्टीने हा लेख अंकात समाविष्ट केला आहे.*
*- संपादक*

आदरणीय प्राध्यापकहो,

सप्रेम नमस्कार विनंती विशेष !

तर अखेर तुमचा संप मिटला. गेले काही दिवस चाललेलं हे (साग्र) संगीत मानापमान शेवटी शिक्षक महासंघाने संप मागे घेतल्याचं जाहीर केल्याने संपलं. अर्थात, शिमगा सरला तरी कवित्व चालूच आहे. त्यामुळे वेगवेगळी वर्तमानपत्रे संप का मिटला? यावर चर्चा करत आहेत. काहींच्या मते तो 'सरकारचा कणखरपणा आणि शिक्षकांचा पराभव' आहे तर काहींच्या मते वरचा आदेश. काहींना हा पालकशक्तीचा प्रभाव वाटतो तर काहींना अभाविप चा दबाव. काहींच्या दृष्टीने हा युतीतला बेबनाव आहे तर काहींच्या.... जाऊ दे सर ! काय आहे, या सगळ्या गोष्टी इतक्या वरून होतात की इतरांप्रमाणे आम्ही देखील या वादात आमचं विद्यार्थ्यांचे स्थान महत्वपूर्ण आहे हे विसरलो आहोत. त्यामुळे संप का मिटला? किंवा मुळात तो इतके दिवस का चालला? यात आम्हाला बिल्कुल रस नाही.

पत्राचे कारण म्हणजे, एका बाबतीत सर्व वर्तमानपत्रांचं एकमत दिसलं, ते म्हणजे 'विद्यार्थ्यांनी सुटकेचा निःश्वास सोडला!' पण काय हो सर, तुम्हाला खरंच असं वाटतं की आम्ही निःश्वास सोडला असेल? नाही, म्हणजे काय होतं की, जानेवारीपर्यंत ५०/६० टक्के विद्यार्थी महाविद्यालयात यायचे, पण सर तुमचा 'ऑफिशियल बंक' असल्यामुळे आम्हाला मजा मारता यायची. घासू होते त्यांनी घरी बसून अभ्यास केला, कला, क्रीडा, सांस्कृतिक वगैरे भानगडीत ज्यांना रस होता त्यांनी तेथे झेंडे फडकवले आणि उरलेल्या आमच्यासारख्यांना 'कॉलेज कॅम्पस' होताच. हो! अहो कॅन्टीन मालकांनी किंवा पान सिगरेटच्या टपऱ्यांनी थोडाच संप पुकारला होता. पण आता संप मिटल्यामुळे काय झालयं की, अटेन्डन्स नावाचा राक्षस आ वासून उभा आहे. आता अधूनमधून वर्गाचे दर्शन घ्यावं लागणार किंवा थोडा अभ्यास करावा लागणार आणि महत्त्वाचं म्हणजे, प्रीलिम्स होणार म्हणून जरा धडकीच भरली आहे. तसं संपाचं आम्हाला मुळीच दुःख नव्हत. हां, फक्त परीक्षा कधी होणार याची काळजी होती पण तीही पालकांना जास्त. आम्हाला काळजी होती मे ट्रिप्स ठरवीता येत नाहीत म्हणून. त्यामुळे परीक्षांच्या तारखा कळल्यावर खरा निःश्वास बहुधा टूर्स आणि ट्रव्हल्सवाल्यांनी सोडला असावा !

सॉरी हं सर ! खुलेआम तुम्ही शिकवत नव्हतात ते बरंच होतं म्हणायचं , म्हणजे जरा अतिच झालं ! पण काय करणार, कॉलेजमध्ये शिक्षण होत नाही हो सर. एकतरं सहा तासांच्या कुंपणात अभ्यासक्रम मावता मावत नाही. आणि त्यात ह्या सहा तासातले जेमतेम ४ फारतर फार ५ होतात. पुन्हा (तुमच्यासारखे अपवाद वगळता) शिकवणारे शिकवतील कसे याचाही नेम नाही. शिवाय क्लासेस नसते तर जरातरी कॉलेजची ओढ राहिली असती पण पौर्णिमेच्या चंद्रासारखा क्लासेस विरुद्धचा सरकारी बडगा कलेकलेने घटतोय आणि आता क्लासेस बिनधोर चालू आहेत. मग सांस्कृतिक कार्यक्रम, क्लासेसमध्ये न होणारे विषय आणि

प्रात्यक्षिक याखेरीज कॉलेजची फारशी गरज उरलीच नाही.

आता मात्र तुम्ही चिडलेले असाल सर ! पण पत्र फाडू नका एवढ्यात. अहो या करता तुम्हाला जबाबदार नाही धरत आहे मी सर. आम्हाला ठाऊक आहे तुमच्यावर कामाचा अतिरिक्त बोजा पडतो. प्रत्येक महाविद्यालयात २-३ रिक्त जागा असतात हे आम्ही ऐकलंय. निवडणूकांसारखी अतिरिक्त कामं तुमच्यावर येतात आणि कधीकधी तर म्हणे पगारही सही केल्यापेक्षा कमी मिळतो अशी 'अंदर की बात' आम्ही ऐकलं आहे. एवढं करून बहुतेक महाविद्यालयांची परिस्थिति यथातथा असल्याने कधी फळ्याला चीर तर कधी खडू नाही. डस्टर्स गायब आहेत, प्रात्यक्षिकांसाठीची रसायनं संपली आहेत, उपकरणं 'जखमी' आहेत, असा साधनांच्या बाबतीतही आनंद असतो. अभ्यासक्रम तर इतका 'सुरस' असतो की शिकवताना प्राध्यापकाचा आधीच उत्साह संपावा. पुन्हा हल्ली 'उत्साही' राजकीय मंडळींची ढवळाढवळ आणि त्यांच्या बारसांचे उद्योगसुद्धा शिक्षण क्षेत्रात वाढायला लागलेत. एवढं करून 'मास्तराला' समाजात तेवढासा मान नाही ते वेगळंच. ह्या सगळ्यात परत इतर सर्वांचे पगार वाढवून तुमचा वाढवला नाही म्हटल्यावर राग येणारच !

पण प्रश्न असा आहे सर की ही परिस्थिती बदलणार कोण? आमच्या शिक्षणात भरपूर बदलांची गरज आहे. दिवसातल्या अभ्यासाच्या तासांचा वेळ व संख्या वाढवून महाविद्यालयात शिकवता आलं पाहिजे. अभ्यासक्रम मनोरंजक (म्हणजे टाईमपास नव्हे) आणि अत्याधुनिक असला पाहिजे. पगार नाही तर किमान साधनं तरी उपलब्ध असली पाहिजेत. 'काही जमलं नाही तर प्राध्यापक' हा B.Ed. ला प्रवेश घेणाऱ्यांचा दृष्टिकोन बदलला पाहिजे. कॉलेज व होस्टेलवर कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी शिक्षकाला व्यापक अधिकार दिले पाहिजेत. अध्यापनाखेरीज सर्व कामं शिक्षक/अध्यापकांवर ढकलता येतील असा प्रशासनाचा दृष्टिकोण बदलला पाहिजे. थोडक्यात विद्यार्थ्यांना घासूनपुसून जगात सोडण्याचा तुमचा जन्मसिद्ध अधिकार तुम्हाला बजावता यायला पाहिजे. पण हे सगळं करणार कोण सर? शिबीर संपांना पाठिंबे, अधिवेशनं याखेरीज विद्यार्थीसंघटना काही करत नाहीत. विद्यार्थ्यांना क्लास असल्यामुळे फरक पडत नाही. पालकांना क्लासच्या फीचा भुर्दंड सोसावला लागला तरी 'आपण काही करू शकत नाही' ही भावना त्यांच्यात खोलवर रुजलेली आहे. न्यायदेवतेच्या डोळ्यावर पट्टी असल्याने ऐकवाल त्यावर तिला निर्णय घ्यावा लागतो आणि प्रशासनाला ज्ञानेंद्रिय नसावीत. कोणी तरी प्रहार केल्याशिवाय कामे करू नयेत अशी आमची सवय आहे.

पत्रं लिहलं ते म्हणून सर ! तुमची मागणी न्याय्य आहे तुम्हाला पगार दिला गेला पाहिजे हे, खरं सर. पण कधी तरी इतर मागण्यासाठीही संप करा ना सर. अतिरिक्त काम चालणार नाही, साधनं उपलब्ध असलीच पाहिजेत, भरपूर वेळ मिळाला पाहिजे, राजकीय हस्तक्षेप चेचून टाकला पाहिजे, तंगड्या वर करून सिगरेटी फुकणारे विद्यार्थी कँटीनमध्ये चालणार नाहीत, सांस्कृतिक कार्यक्रमाला पाठवळ पाहिजे अशा मागण्याही सरकारला ठणकावून सांगा ना सर. तुमच्याकडे शक्तिशाली संघटन आहे. घटनेने संप करण्याचा अधिकार (न्याय्य मागण्यांसाठी) दिलेला आहे. युवाशक्तीच्या तुम्ही जवळचे आहेत. पालकांपर्यंत तुमचा आवाज पोचतो. जुलमी राज्य उलथवणाऱ्या चाणक्यासारख्या शिक्षकांचा तुम्ही वारसा सांगता, तर मग एकदा फक्त एकदा प्लीज सर कधीतरी 'अध्यापनाच्या व्यवसायासिद्ध आणि मूलभूत' अधिकारासाठी संप पुकारा ना सर. मंत्रालयातल्या धनानंदाचा थरकाप उडवा ना सर. मग विद्यार्थीसंघटनाच नव्हे तर सामान्यातला सामान्य विद्यार्थीसुद्धा तुमच्याबरोबर रस्त्यावर उतरेल. कदाचित रस्त्यात उतरण्याची गरजही उरणार नाही. ह्यावरही कधीतरी विचार करा. सर !

आगावूपणाबद्दल क्षमस्व ! कळावे लोभ असावा!!
(अध्यापनाचा)

**अजित श. जोशी**
९ अंजनेश्वर सोसायटी, तेजपाल स्कीम रोड नं. ३,
विलेपार्ले (पूर्व) मुंबई - ४०० ०५७.

•••

# एड्सच्या विळख्यात : एक वाचनीय पुस्तक

**प्रा. मोहन पाठक**

*नव्याने प्रकाशित झालेल्या ग्रंथांचा परिचय व्हावा या दृष्टीने 'ग्रंथ परिचय' हे सदर दिशा मध्ये समाविष्ट करावयाचे आहे. आपल्या वाचनात असे एखादे उल्लेखनीय पुस्तक आल्यास इतर वाचकांसाठी आपण त्याचा परिचय लिहावा व दिशासाठी पाठवावा. आपण पाठविलेल्या अशा परिचयाचा आम्ही नक्कीच विचार करू.*

श्री. किरण गावंड हे व्यवसायाने डॉक्टर नाहीत. तरीही अतिशय अभ्यास करून परिश्रम घेऊन निर्धाराने व समाजाचे आपण काही देणे लागत असल्याच्या भावनेपोटी त्यांनी एड्सच्या विळख्यात हे छोटेखानी उपयुक्त पुस्तक लिहिले. लेखकाचे आवाहन यात ते म्हणतात, मी काही लेखक नाही, डॉक्टर नाही, वा संशोधकही नाही. (पृ. ४) तरी सुद्धा या अवघड विषयावर त्यांनी पुस्तक लिहिले. समाज निरीक्षणातून सर्व सामान्य माणसाच्या, विशेषत: अर्ध शिक्षित युवकांच्या या विषयाबाबतच्या आवाक्याचा त्यांनी अभ्यास केला व या विषयाबाबत मार्गदर्शन करू शकेल अशा सोप्या पुस्तकाची निकड त्यांना जाणवली.

गेल्या, किंबहुना संपत आलेल्या शतकातील महाभयंकर रोग असे या रोगाचे वर्णन केले जाते. या रोगाचा प्रादुर्भाव होणे म्हणजे मृत्यूला निमंत्रण हे सर्वांना प्रसार माध्यमांमुळे माहीत असते. पण अर्धवट माहितीतून मनात भांबावलेपणा येणे अधिक शक्य असते. जगभरचे वैद्यक शास्त्रज्ञ आव्हान म्हणून या रोगाशी झगडत आहेत प्रसार माध्यमे आपापल्या कुवतीनुसार या रोगाबद्दल जनतेस सावध करीत आहेत. गेल्या दशकात संगणक व इंटरनेट याबरोबरच एड्स वर जितके लेखन झाले तेवढे अन्य एखाद्याच विषयाबाबत झाले असेल. सर्व भाषांतून या रोगावर पुस्तके आली आहेत. मात्र या रोगाची किचकट परिभाषा, याचे गुंतागुंतीचे स्वरूप यामुळे ही पुस्तके चांगली असूनही सर्वसामान्य माणसाच्या समजुतीच्या आवाक्या पलीकडील आहेत. श्री. गावंड यांचे हे पुस्तक अतिशय महत्त्वपूर्ण आहे, उपयुक्त आहे.

या पुस्तकाची रचना त्यांनी अतिशय तर्कशुद्ध पद्धतीने केली असून टप्या टप्याने या रोगाचे संदर्भ ते स्पष्ट करीत गेले आहेत. ९ प्रकरणात विभागल्या गेलेल्या या पुस्तकाची सुरुवात ' एड्सचा ' अर्थ सांगण्यापासून होते. या पहिल्याच प्रकरणात (पृ. १३) त्यांनी अर्धवट माहिती पसरण्यास कारणीभूत असलेल्या घटकांबद्दल चर्चा केली आहे. नंतर AIDS, HIV, विषाणू RBC, WBC अशा अनेक शब्दांचा सोप्या भाषेत त्यांनी अर्थ विशद केला आहे. पृ. २१वरील विषाणुचे छेद चित्र कोणालाही समजेल इतके स्पष्ट करून सांगितले आहे.

यानंतरच्या प्रकरणातून एड्सचा इतिहास, गैरसमज, प्रतिबंधक उपाय, लक्षणे, औषधोपचार इ. बाजू स्पष्ट करून सांगितल्या आहेत. औषधोपचार या प्रकरण्याचे वैशिष्ट्य असे अलोपथी व पर्यायी (पृ.७९) अशा दोन्ही, उपचार पद्धतींचे सविस्तार विश्लेषण करून उपयुक्त माहिती संकलित केली आहे. या प्रकरणातील सर्वसामान्यांना अतिशय उपयोगी ठरेल असे प्रकरण म्हणजे या रोगावर मार्गदर्शन करणाऱ्या भारतातील केंद्रांचे त्यांनी पत्ते दिले आहेत.

या पुस्तकाचे खास वैशिष्ट्य ठरावे ते म्हणजे या पुस्तकाची निवेदन पद्धती व भाषा. अतिशय सोप्या भाषेत, वाचणारास सहज कळेल असे शब्द वापरून विवेचन केले आहे.

मित्रांनो, आता आपण या पुस्तकाच्या दुसऱ्या भागाकडे वळू (पृ.२८) मित्रांनो, आता तुमच्या लक्षात आले असेल की (पृ. ४८) या पद्धतीची वाक्ये विवेचनात सुलभता तर आणतातच पण जो अर्धशिक्षित किंवा सामान्य माणूस श्री. गावंड यांच्या नजरेसमोर आहे त्याला या पुस्तकात गुंतवून पुढे मदत नेण्यास करतील अशी आहेत. हा माणूस सामान्यतः वाचन टाळणारा असतो. त्याला जर अभ्यासक पद्धतीने पटवून सांगितले तरच तो वाचतो. श्री. गावंड यांनी या वाचकाचे हे मानसशास्त्र अचूक आहे.

एड्स वरील किमान माहिती असणे ही या काळाची गरज आहे. हे लक्षात घेता हे पुस्तक लिहून श्री. गावंड यांनी केवळ समाज कार्यच केले आहे असे नाही तर या विषयावरील एक महत्वाचे ठरेल असे पुस्तक या विषयाच्या साहित्यात निर्माण केले आहे. सर्वसामान्य माणसाने वाचावे, प्रसार करावा, दुसऱ्याला वाचायला उद्युक्त करावे असे हे पुस्तक घराघरात असणे आज आवश्यक आहे.

रोटरी ची पार्श्वभूमी गृहरक्षक दलाच्या पार्श्वभूमीमूळे असेल सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेचे एक उत्कृष्ट उदाहरण श्री. किरण गावंड यांनी निर्माण केले आहे. शासनासारख्या संस्थांनी तर याची आवर्जून दखल घ्यायला हवी.

एडसच्या विळख्यात

**श्री. किरण गावंड**

प्रकाशक : रोटरी क्लब ऑफ ठाणे लेकसिटी, ठाणे.

१९९८, पृ. ११८, मूल्य : ३०/- फक्त

•••

(पान क्र. ५ वरून)

**'गनिमीकावा' या युद्धशास्त्राचे अनमोल उदाहरण 'प्रतापगड युद्ध'**

हे भारतातील पहिले ठरले आहे. या पहिल्याच फिरत्या- "प्रतापगड युद्ध दर्शनाचे" अनेक प्रयोग महाराष्ट्रात ठिकठिकाणी झाले आहेत. तसेच प्रेक्षकांकडूनही त्याला उदंड प्रतिसाद मिळाला आहे. अनेक मान्यवरांनी, साहित्यिकांनी, नाट्य, सांस्कृतिक, ऐतिहासिक, सामाजिक व राजकिय क्षेत्रातील मान्यवरांनी हे प्रदर्शन गौरविले आहे. अशा रसिक प्रेक्षकांचे असंख्य अभिप्राय आज माझ्याकडे झालेले आहेत. काही अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

"युद्ध शास्त्राचे अध्ययन हा राष्ट्रीय अग्रक्रमाचा विषय असावा. या प्रदर्शनाच्या उपक्रमातून तरूणांमध्ये लष्करी शिक्षणाविषयी उत्सुकता व आवड निर्माण होईल. याची मला खात्री आहे. नुसते शिवनामाचे प्रदर्शन करण्यापेक्षा अशी प्रदर्शने अधिक महत्वाची . हे प्रदर्शन नसून 'सुदर्शन' आहे. भवानीतरवारीचा निष्फळ शोध घेण्यासाठी परदेशी वाऱ्यांवर लाखो रूपये खर्च करण्यापेक्षा सरकारने तो पैसा अशा उपक्रमांना दिल्यास कारणी लागेल. ह्या देशभक्तीप्रेरक उपक्रमाचे समाजाने व सरकारने सक्रिय स्वागत केले पाहिजे. मी त्यास सुयश चिंतितो !"

*नाटककार, साहित्यिक- (कै.) विद्याधर गोखले*

(माजी संपादक लोकसत्ता)

**श्री. अरुण ठाकूर**

अरुण दर्शन, महात्मा गांधी पथ,

नौपाडा, ठाणे ४०० ६०२.

•••

# मराठी भाषा संकल्प प्रतिज्ञा

**श्री. अ. वि. सहस्रबुद्धे**
मुख्याध्यापक, डॉ. बेडेकर विद्या मंदिर

*मराठी भाषेची उपेक्षा थांबून, मराठीचा वापर वाढला पाहिजे. यासाठी तसा संकल्प प्रत्येक मराठी माणसाने करावयास हवा. याचा विचार या लेखात आहे. - संपादक*

भारत माझा देश आहे. या देशातील महाराष्ट्र ही माझी जन्मभूमी आहे. महाराष्ट्राची मायबोली मराठी आहे. महाराष्ट्राच्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन सर्व लोक व्यवहारात मराठीचाच वापर सुपूर्णपणे होत जावा यासाठी जो हक्क प्रस्थापित करावयाचा त्यासाठी संघटित प्रयत्नांत भाग घेईन. माझ्या मराठी भाषेवर इतर कोणत्याही भाषेचा पगडा राहणार नाही ही दक्षता को कटाक्षाने घेईन.

जागतिक ज्ञानाचे दार इंग्रजी भाषेने उघडे केलेल आहे. त्या ज्ञानासाठीच केवळ इंग्रजी ही भाषा म्हणून स्वीकारीन. ही भाषा स्वीकारताना लागणारे माध्यम म्हणून मराठीचाच आग्रह उत्तरोत्तर वाढीस लावीन.

मराठी भाषेचा संकल्प हा इंग्रजी हटावसाठी आहे असा दुष्टप्रचार जर कोणी केला तर ते योग्य नाही असे स्वाभिमानाने सांगेन. घराघरातून व लोकव्यवहारात मराठी भाषा दुरावली याचे कारण राज्यव्यवहार मराठी करण्यात अक्षम्य टाळाटाळ झाली. हा टाळाटाळ नाहीशी करण्यासाठी हट्ट धरणे हा माझा हक्क आहे. मतदानाचा मला जो हक्क आहे तो मी याच प्रतिज्ञेला अनुसरुन वापरात आणीन.

**प्रस्तावना**

भारतीय राज्यघटनेने मान्यता दिलेल्या ज्या एकूण १४भाषा आहेत त्यात मराठी ही एक आहे. असे असूनही महाराष्ट्रात मराठी भाषेच्या वापराबाबत अक्षम्य हेळसांड झाली आहे. यातून होणाऱ्या अन्यायास कुठे तरी वाचा फुटावी या हेतूनेच वरील मराठी भाषा संकल्प प्रतिज्ञा जन्मास आली आहे. या प्रतिज्ञेतील शब्द न शब्द महत्वाचा व अर्थपूर्ण असला तरी त्यातील गर्भित अर्थ व प्रतिज्ञेचे महत्त्व विशद करताना खालील मुद्यांचा परामर्ष घेणे आवश्यक ठरते.

१) महाराष्ट्राची मायबोली मराठी असून तिला ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरा आहे. असे असूनही आज लोकव्यवहारात तिची उपेक्षा होत आहे व ही उपेक्षा थांबवण्याचा हक्क प्रत्येक मराठी माणसास आहे व तो त्यात मिळविला पाहिजे.

२) ज्ञानाच्या कक्षा वाढविण्या करता प्रत्येकाने इंग्रजीचा आधार घेतला पाहिजे. पण तो घेतानाही माध्यम म्हणून मराठीचा वापर करावयास हवा.

३) घराघरातून व लोकव्यवहारातून मराठी भाषा का दुरावली आहे. याची कारणे जाणून ती नष्ट करण्याचा प्रयत्न करावयास हवा व ' मराठीचा वापर म्हणजे इंग्रजीचा दुस्वास' हा प्रकार थांबवण्यासाठी प्रयत्नशील असावयास हवे.

आता वरील प्रत्येक मुद्याचा उहापोह करणे आवश्यक ठरते. लोकव्यवहारात मराठीचा उपेक्षा होण्याची कारणे प्रथम जाणून घ्यावयास हवीत. अशी उपेक्षा होण्याची

कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१) इंग्रजी शासन जाऊन स्वातंत्र्य मिळाले तरी आमच्या वरील इंग्रजाची मोहिनी अजून दूर झालेली नाही.

२) इंग्रजी बोलता लिहिता येणे हे सुशिक्षित व अत्युच्च असल्याचे लक्षण मानले गेले.

३) इंग्रजी शिकलो नाही तर या जगात तरणोपाय नाही अशी पिढ्यान पिढ्या चालत आलेली समजूत अजूनही आमच्या मानगुटीवर वरून उतरावयास तयार नाही.

४) आमच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणात इंग्रजी भाषेच्या अभ्यासात अवास्तव महत्त्व दिले गेलेले आहे.

५) इंग्रजी शब्दाचा वापर मराठी बोलताना केल्याशिवाय आम्हाला विचाराचे आदान प्रदानच दैनंदिन जीवनात करता येत नाही.

६) मराठी व तिच्यावर आधारित लोकभाषा यांच्या विकासासाठी व जतनासाठी आम्ही आजवर प्रामाणिक प्रयत्न केले नाहीत. वरील सर्व गोष्टी विचारात घेताना क्रमांक ५ चा मुद्दा फार महत्त्वाचा आहे. आजही आम्हा सुशिक्षित लोकांना लोकव्यवहार करताना इंग्रजी शब्द वापरण्याची सवय पडून गेली आहे. ती सवय सोडून द्यावयास हवी. उदाहरणार्थ आम्ही लोकव्यवहार करताना खालील इंग्रजी शब्द मराठीचे म्हणून सरसकट वापरतो. अशा शब्दांचा यादीच खाली देत आहे.

१) स्टेशन २) टाईम ३) लव ४) टेबल ५) हॉलिडे ६) फाईन ७) लव्ह ८) चेअरमन ९) साईन १०) बुलेटिन ११) बोअर १२) हॉटेल १३) स्कूल १४) अॅपिलेकशन १५) टाईम पास १६) डॉक्टर १७) कार १८) डायनिंग कार १९) रिझर्वेशन २०) ट्युशन २१) विंटर २२) समर २३) मिटींग २४) अपॉइंटमेंट २५) फर्स्ट क्लास २६) क्लासेस २७) मॅच २८) रेडिओ २९) टीव्ही ३०) ब्रोकर ३१) मार्केट ३२) फॉर्म ३३) रायटर ३४) टायड ३५) हॉल ३६) मॅरेज ३७) लंच ३८) डायनिंग टेबल ३९) सूटकेस ४०) बँक ४१) ट्रव्हल्स ४२) इंजिनिअर ४३) ज्यूस ४४) हॉस्पिटल ४५) ऑपरेशन ४६) मेडिसीन ४७) ऑफिस ४८) टूथब्रश ४९) अॅक्सिडेंट ५०) ड्रायव्हर ५१) गार्ड ५२) बॉक्स ५३) मर्चंट ५४) ट्रीप ५५) सोप ५६) डीटर्जंट ५७) क्लीनिक ५८) व्हीटॅमिनस् ५९) [illegible] ६०) पॅन्ट ६१) टी ६२) पेन्शन ६३) प्राव्हीडंड फंड ६४) एरोप्लेन ६५) पिक्चर ६६) एक्झामिनिशेन ६७) एअर कंडिशन ६८) एअरपोर्ट ६९) टी ७०) ट्रीन ७१) क्वीन ७२) ऑईल ७३) रिप्रेझेन्टेटेव्हीव्ह ७४) अलटरनेटीव्ह ७५) लायसन्स ७६) ब्लॉक ७७) फ्लॅट ७८) टेनंट ७९) टाईपींग

ही यादी न संपणारी आहे व आपणास इंग्रजी शब्द किती मुरलेले आहेत हे दर्शविल्यास पुरेशी आहे.

आणीवपूर्वक व अशा सर्व शब्दाना सोपे असणारे असेही शब्द वापरण्याचा अट्टाहास आम्हा केला तर लोकव्यवहारात मराठी शब्द रूळतील व आपोआपच इंग्रजीचा प्रभाव कमी होईल. लोकव्यवहारात मराठी पुढे आणावयाची असेल तर महाराष्ट्रात तरी मातृभाषेतूनच प्राथमिक व माध्यमिक शिक्षण हा एकच पर्याय आम्ही स्वीकारावयास हवा. महाराष्ट्र व मुंबई बहुभाषीय आहे. आमचे दरवाजे कोणासही उघडे आहेत या सबबीखाली अल्पसंख्यांक शाळांचे हट्ट व लाड पुरवीत बसून मराठीची गळचेपी करावयाची हा शासनाचा अनेकवर्षांचा व्यवहार सनदशीर चळवळीतून खंडित करावयास हवा.

आता मुद्दा २) चा विचार करावयास हवा. इंग्रजांनी या देशात 'बाबू' लोक तयार करण्यासाठी विशिष्ट शिक्षण पद्धती राबवली तिचा खऱ्या अर्थाने आम्ही त्याग केला का?

जर्मनी, रशिया, जपान यासारख्या देशात उच्च शिक्षण घेताना किंवा ज्ञानाच्या कक्षा वाढविण्याचा प्रयत्न

करतांनाही इंग्रजीचा वापर टाळलेला आढळतो मग आम्हास इंग्रजीचा आधार का घ्यावा लागतो. मराठी भाषेचा विकास करण्याचा ती समृद्ध करण्याचे खऱ्या अर्थाने प्रयत्न झाले नाहीत. म्हणूनच आम्हास ज्ञान कक्षा वाढविण्यास इंग्रजीचा आधार अजूनही घ्यावा लागतो. पण हे आता अती झाले आहे. मराठीचा विकासासाठी लक्ष दिले तर हेही टाळता येईल.

हा दृष्टीने या प्रतिज्ञेतील सर्वांत महत्त्वाचा ३रा मुद्दा आहे. त्याचबरोबर आजवर मराठी भाषेला राज आश्रय मिळालेला नाही. तो प्रत्यक्ष व्यवहारात मिळवता येईल. यासाठी प्रथम जाणीवपूर्वक प्रयत्न करावयास हवेत. ठराव खूप झाले पण अंमलबजावणी नाही, यासाठी लढा देण्याची तयारी करावयास हवी.

जेथे राजआश्रय आहे तेथे सर्व प्रश्न लवकर सुटतात हा आजवरचा अनुभव आहे.

संयुक्त महाराष्ट्राचा मंगलकलश येऊन अनेक वर्षे झाली तरी मायबोली मराठीचा सम्राज्ञीचे स्थान मिळालेच नाही. सध्या महाराष्ट्रात शिवशाही अवतरली आहे. त्याचा फायदा घेऊन राज्यव्यवहारात मराठीचा अधिकाधिक वापर कसा होईल हे पाहिले तर आपोआपच लोकव्यवहारात मराठीला योग्य स्थान मिळाल्याशिवाय राहणार नाही.

राज्यव्यवहार व लोकव्यवहार संपूर्णपणे मराठीत चालेल हे स्वप्न न राहता प्रत्यक्षात येण्यासाठी म्हणून कालमर्यादेचे बंधन घालून घ्यायला हवे. तरच प्रतिज्ञेत म्हटल्याप्रमाणे महाराष्ट्राचा परंपराचा अभिमान सार्थ ठरेल.

लोकव्यवहार व राज्यव्यवहारात मराठीची उपेक्षा थांबविण्यासाठी खालील ठोस कार्यक्रमांची अंमलबजावणी करावयास हवी.

१) मराठी लोक जागृती शिबीरे भरविणे

२) सर्व शासकीय कार्यलयात मराठीचा वापर अनिवार्य करणे

३) इंग्रजी माध्यम शाळांना आलेले अवास्तव महत्त्व कमी करण्यासाठी लोकजागृती व समाज मत तयार करावयास हवे.

४) तंत्रज्ञान व विज्ञान यांचे ज्ञान घेताना मराठीचा वापर करण्यासाठी आवश्यक तो मराठी भाषा विशिष्ट कार्यक्रम अंमलात आणावयास हवा.

५) मी स्वाक्षरी मराठीत करेन, बोलताना, लिहितांना इंग्रजी शब्दांचा वापर करेन असा एक प्रत्येकांना कानून करावयास हवा.

६) मराठी भाषा विकास प्रयत्नांना सहाय्यभूत ठरणाऱ्या व्यक्तींचा व संस्थांना शासनाने गौरव करावयास हवा.

७) मराठीचा पाया असणाऱ्या लोकभाषा व बोली भाषांच्या विकास कसा होईल हे पहावयाचे हवे.

८) मराठी भाषा संकल्प, प्रतिज्ञा हा शाळाशाळातून व घराघरातून पोचवयास हवी.

•••

## दुःखद निधन

शाळा परिसरात गेली ८ वर्षे सफाई कामगार म्हणून काम करणाऱ्या सौ. गंगा छगन जेठवा यांचे दि. १४.५.९९ रोजी अकस्मात निधन झाले. ती अतिशय उत्साही व तत्परतेने काम करीत असे. ईश्वर तिच्या आत्म्यास शांती देवो.

# परीक्षा पद्धतीला अवास्तव महत्त्व दिले जात असल्याने शिक्षणाची मूळ उद्दिष्टे साध्य होत नाहीत.

**श्री. प्र.ग.वैद्य**

> या महिन्याचे जे विशेष आहेत त्यात २८ जुलैला येणारी गुरुपौर्णिमा हा एक विशेष. त्या निमित्ताने जुने अनुभवी शिक्षक श्री. प्र.ग. वैद्य यांचे शिक्षणविषयक चिंतन या लेखातून व्यक्त झाले आहे.- संपादक

आज जर एखाद्या विद्यार्थ्याला प्रश्न विचारला की 'तू शाळेत का जातोस, का शिकतोस, सर्व विषयांचा अभ्यास मेहनत घेऊन का करतोस ?' तर तो पटकन उत्तर देईल ' परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी !' पुढे तो म्हणेल, 'एस.एस.सी.-झालो की प्रमाणपत्र मिळेल. त्याच्या आधारे नोकरी मिळेल किंवा पुढील शिक्षण घेता येईल. शिक्षक, पालक ही त्याला परीक्षेत उत्तीर्ण झाले पाहिजे असेच सतत बजावीत असतात. ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी तो विद्यार्थी पूरक अशा मार्गांचा अवलंब करतो. तो परीक्षेत अपेक्षित असलेल्या प्रश्नांची उत्तरे तोंडपाठ करतो, त्यांची घोकंपट्टी करतो. उत्तरे व्यवस्थित लिहिता यावीत म्हणून तो कोचिंग क्लासेसना जातो. परीक्षेचे वेळी प्रश्नाचे उत्तर येत नसेल तर तो कॉपी करतो किंवा अन्य वाममार्गांचा उपयोग करतो.

जर परीक्षा बंद केली व प्रत्येक विषय शिकण्याची उद्दिष्टे विद्यार्थ्याला सांगितली तर तो विद्यार्थी तो-तो विषय त्या त्या उद्दिष्टाने शिकेल. त्या त्या विषयांचा चांगला व मनापासून अभ्यास करील. उदाहरणार्थ वर्षभर सातत्याने वर्गात उपस्थित रहाणारा व विषयाकडे नीट लक्ष देणारा विद्यार्थी वर्ष संपताच परीक्षा न घेता पुढच्या वर्गात जाईल. असा तो १०वी पर्यंत वरच्या वर्गात जात राहील. अशी पद्धत सुरू झाल्यानंतर व ती रुळल्यानंतर जर एखाद्या विद्यार्थ्यास वरील प्रमाणेच प्रश्न विचारला की तू शाळेत का जातोस, तर तो उत्तर देईल मला विविध विषयांचे ज्ञान व्हावे, ते विषय मला कळावेत, म्हणून मी शाळेत जातो. मी परीक्षेत उत्तीर्ण व्हावे म्हणून शाळेत जातो असे तो म्हणणार नाही. साहजिकच विषय शिकण्याची उद्दिष्टे त्यामुळे साधली जातील. ह्या विषयावर सविस्तर पणे विचार मांडता येतील पण लेखाची मर्यादा लक्षात घेऊन ते विचार येथे मांडत नाही.

शिक्षणाची उद्दिष्टे प्राचीन काळापासून शिक्षणतज्ज्ञ सांगतच आले आहेत. मनुस्मृतीतील चार आश्रमातील 'ब्रह्मचर्याश्रम' हा शैक्षणिक टप्पा. त्या मनूने म्हटले आहे, '' मानसिक, बौद्धिक आणि शारीरिक सामर्थ्यांचा सर्वांगीण विकास म्हणजे शिक्षण !'' त्यानुसार गुरुंच्या आश्रमात राहून, स्वावलंबनाने शिष्य शिक्षण घेत असे. पहाटे लवकर उठणे, थंड पाण्याने आंघोळ करणे, सूर्य नमस्कार व अन्य व्यायाम करणे, शेती करणे, गुरे राखणे, झाडलोट करणे, लोकांची सेवा करणे, ईश्वरोपासना करणे, ग्रंथांचे - बौद्धिक विषयांचे अध्ययन करणे, इत्यादी कामे तो करीत असे. त्यातून सर्व उद्दिष्टे साध्य होत असत. खऱ्या अर्थी 'फोर एच' (हेड, हार्ट, हॅन्ड, हेल्थ) असा बौद्धिक, भावनिक, औद्योगिक, शारीरिक विकास म्हणजे सर्वांगीण विकास तो गुरुही करून घेत असे. बाहेरील जगाचे हुबे हुब चित्र या शिक्षणातून प्रतिबिंबित होत असे.

पुढे गुरु राजाश्रय घेऊ लागल्याने हे आश्रम नष्ट झाले. त्या नंतर अनेक वर्षांनी भारतात इंग्रजांची सत्ता

आली. ब्रिटिश राज्ययंत्रातील हजारो लहान मोठी चाके फिरती ठेवणे व त्यासाठी आवश्यक ते कारकून तयार करणे म्हणजे निव्वळ पुस्तकी शिक्षण घेणे एवढेच शिक्षणाचे उद्दिष्ट इंग्रजांचे होते. त्या साठी बौद्धिक, लेखी परीक्षा घेतल्या जाऊ लागल्या. परीक्षा उत्तीर्ण झाला की नोकरी मिळू लागली. त्यामुळे पुस्तकी शिक्षणाची हाव वाढली. शिक्षण घेतलेले लोक कावाड कष्ट करीनासे झाले. लोकांनी पिढीजात धंदेही बंद केले. सर्वत्र कृतिशून्यता निर्माण झाली. पुढे पदवीधरांची संख्या वाढली. पण तेवढ्या प्रमाणात नोकऱ्या नसल्याने बेकारांचे प्रमाण वाढू लागले. बेकारांच्या झुंडीच्या झुंडी निर्माण झाल्या. भारत स्वतंत्र होऊन आज ५० वर्षे पूर्ण झाली आहेत तरी बेकारांचे प्रमाण कमी होत नाही. उलट वाढतच आहे. 'इंग्रजांनी सुरू केलेली ही परीक्षा पद्धती व निव्वळ पुस्तकी ज्ञान म्हणजे शिक्षण ही कल्पना' अद्याप नाहीशी झाली नाही.

वास्तविक पहाता 'ज्या संस्कारांनी विद्यार्थ्यांचे संपूर्ण व्यक्तिमत्व विकसित होते त्या संस्कार समुच्चयाला शिक्षण' म्हणतात. अशी व्यापक व्याख्या शिक्षणाबद्दलची आहे. हीच 'फोर एच' ची कल्पना आहे. सॉक्रेटीस, कोमिनियस, रूसो, पेस्टालोत्सी, फ्रबल, हेर्बार्ट, मारीया मॉंटिसरी, आर्मस्ट्रॉंग, जॉन ड्यूई, महात्मा गांधी इत्यादी सर्व विचारवंतांनी, शिक्षण तज्ज्ञांनी निव्वळ पुस्तकी ज्ञानाचा तिरस्कार केला व गुणवत्ता वाढविणाऱ्या, अपुस्तकी श्रममूलक विषयांचाही आपल्या शिक्षण पद्धतीत समावेश केला. शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच त्यांचे सूत्र होते.

१९५३ मध्ये भारतात मुदलियार आयोग आस्तित्वात आला. त्या अभ्यासक्रमात अपुस्तकी विषय कार्यानुभव यास स्थान देण्यात आले होते. पण त्याचा प्रभाव पडला नाही.

१९६४-६८ मध्ये कोठारी आयोग स्थापना झाला. त्यात शिक्षणाचा संबंध राष्ट्रीय विकासाकडे, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकडे जोडण्यात आला. राष्ट्रीय विकासातील अडथळे म्हणजे देशातील बेकारी व नागरिकांची भ्रष्टता, अनैतिकता ! सर्वांना व्यवसाय मिळाला पाहिजे, नागरिकाचे वर्तन चांगले पाहिजे म्हणून त्या अभ्यास क्रमात कार्यानुभव व समाजसेवा या विषयांचा समावेश करण्यात आला. कोठारी आयोगाची चतुःसूत्री अशी होती. १) साक्षरता, भाषा, साहित्य व सामाजिक शास्रे यांचा अभ्यास. २) संख्या-विज्ञान यात गणित व भौतिक शास्त्रे यांचा अभ्यास. ३) कार्यानुभव यात शेती विषयक विषय व तांत्रिक व्यवसाय यांचा अभ्यास. ४) समाजसेवा यात स्काऊट-गाईड, एन.सी.सी. व स्वतंत्रपणे तयार केलेल्या 'समाजसेवा' या विषयांचा अभ्यास.

भारत शेतकी प्रधान असल्याने शेती विषयातील १) सुलभ शेती कार्य २) परसातील बागकाम ३) कुंडितील लागवड या विषयांपैकी एक तरी विषय शाळेने घ्यावा असे सुचविण्यात आले होते. समाजसेवा विषयातील स्काऊट-गाईड, एन.सी.सी., समाजसेवा यातील एक तरी विषय शाळेने घ्यावा असे सुचविण्यात आले होते. या चतुःसूत्रीतील सर्व विषयांना गुण द्यावेत अशी शिफारस करण्यात आली होती. पण त्याची अंमलबजावणी झाली नाही. पुस्तकी विषयांना गुण व अपुस्तकी विषयांना श्रेणी देण्यात आली. पुस्तकी ज्ञानाचा पगडा अद्याप सैल न झाल्याचे हे लक्षण आहे. कोठारी आयोगाच्या अभ्यास क्रमाची पहाणी करणाऱ्या ईश्वरभाई पटेल समितीने कार्यानुभव व समाजसेवा या विषयांनाही गुण द्यावेत तरच हे विषय शाळेत नीटपणे शिकवले जातील अशी शिफारस १९८२ साली केली होती. पण त्याचा काहीही परिणाम अभ्यासक्रमाची कार्यवाही करणाऱ्या समितीवर झाला नाही. साहजिकच ज्या विषयांना गुण देण्यात येतात त्या विषयांकडे शाळेने व पालकांनी लक्ष दिले व ज्या विषयांना श्रेणी दिल्या जातात म्हणजेच गुणांच्या टक्केवारीत ज्या विषयांना स्थान

नाही त्याकडे या सर्वांनी दुर्लक्ष केले.

१९८६ पासून नव्या 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणास' प्रारंभ झाला. पण त्यात ही 'अ' पुस्तकी विषयांना न्याय मिळाला नाही. शीलसंवर्धनावर भर देणाऱ्या व उत्तम नागरिक घडविणाऱ्या स्काऊट-गाईड शिक्षणास जर अभ्यासक्रमात गुण देऊन मानाचे स्थान देण्यात आले. तर वेगळ्या नैतिक शिक्षणाची काहीही आवश्यकता भासणार नाही. स्काईट-गाईड या स्वतंत्र संस्था आहे. शिक्षकांना प्रशिक्षण देणे. त्या विषयाची पहाणी करणे ही कामे ही संस्था करते. शिक्षण खात्यास त्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता भासणार नाही. एन.सी.सी. ही सुद्धा स्वतंत्र संस्था आहे. समाजसेवा ह्या विशेष तयार केलेल्या अभ्यासक्रमाच्या संयोजनासाठी व शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी आंतरभारती संस्थेचे सहकार्य शासनाने घ्यावे. ही संस्था आपल्या प्रेरणा प्रबोधन शिबिरातून समाजसेवेचे प्रशिक्षण शिक्षकांना देऊ शकेल. शासनाने तशी त्या संस्थेस विनंती करावयास हवी. 'एन.सी.सी.' या शासनाने तयार केलेल्या विषयाची काही आवश्यकताच भासणार नाही.

कार्यानुभव विषयात सध्या ३० विषयांची यादी देण्यात आली आहे. त्याचा अभ्यासक्रम तयार आहे. त्यात संगणक वगैरे विषय आहेत. कार्यानुभवात चित्रकलेचाही समावेश असल्याने बहुतेक शाळा कार्यानुभव विषयासाठी चित्रकला विषय घेतात. संगणकाचे शिक्षण शाळेतून दिल जावे असे कोणीतरी सुचवितो व अभ्यासक्रमाचा अभ्यास न करता शिक्षण खाते हा विषय शाळेत ठेवण्यात येईल असे आश्वासन देते. प्रत्यक्ष तो विषय कार्यानुभवाचे अभ्यास क्रमात आहे. चित्रकला विषय घेतला नाही तर त्या जागी तो विषय घेण्यात येईल.

रा.शै. धोरणातील दहा गाभातत्वात 'पर्यावरणाचे संरक्षण' हे ही एक तत्त्व दिलेलेच आहे. पर्यावरण विषय हा शाळेत शिकवावा असे आता सुचविले जात आहे. त्याचा आधीच विचार अभ्यास क्रमात आहे.

'अ' पुस्तकी विषयांना गुण नसल्याने त्यांकडे दुर्लक्ष होत आहे. पुस्तकी विषयांना गुण व अपुस्तकी विषयांना श्रेणी हा पंक्तिप्रपंच थांबल्या खेरीज नैतिक शिक्षण, पर्यावरण इत्यादी विषयांकडे शाळा व पालक लक्ष देणार नाहीत. नाहीतर कोणत्याच विषयांना गुण देऊ नका, परीक्षा घेऊ नका !

निव्वळ परीक्षार्थी बनलेल्या विद्यार्थ्यांना ते विषय शिकण्याचे हेतू कळणार नाहीत. केवळ परीक्षेचा विषय म्हणूनच ते त्या विषयांकडे पहातील. परीक्षा पद्धती बंद झाली तर सर्व विषयांचा त्या विषय शिकण्याच्या हेतूसह अभ्यास करतील.

**श्री. प्र.ग. वैद्य**
लक्ष्मी निवास, सामंत ब्लॉक्स शेजारी,
घंटाळी, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : ५४३ २०७३

•••

## विनम्र अभिवादन

कारगिल मधील धारातीर्थी पडलेल्या आमच्या वीर जवानांच्या स्मृतींना आम्ही विनम्र अभिवादन करीत आहोत. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो !

- संपादक

# शतकातले अखेरचे शैक्षणिक वर्ष

प्रा. मोहन पाठक

• उन्हाळ्याच्या दीर्घ सुट्टी नंतर आमच्या शाळा महाविद्यालय परिसरात पुन्हा उत्साहाचे चैतन्याचे वारे सुरू झाले आहेत. विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक यांच्या वर्दळीने परिसर कात टाकावी तसा बदलला आहे. कधी स्वच्छ तर कधी ढगाळलेल्या सूर्याचे किरण आमचे विश्व उजळून टाकीत आहेत. नेमेचि येतो मग पावसाळा या चालीने १९९९-२००० या शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाली आहे. नवीन शतकाचा काऊंट डाऊन सुरू झालेला आहे. त्या पार्श्वभूमीवर या वर्षाची सुरुवात एक या शतकातली अखेरची सुरुवात आहे. पुढचे वर्ष २०००-२००१ असणार आहे.

परिसरात सर्वत्र निकाल निकालाची उत्सुकता, अपेक्षापूर्ती, अपेक्षाभंग यांच्या लहरी विद्यार्थ्यांत आढळताहेत. कोणी पेढे घेऊन येतो तर कोणी पडलेल्या चेहऱ्याने 'काही खरं नाही' हे सूचित करतो. आशा निराशेचे रंग असे दिसत असतानाच एकीकडे प्रवेशाची धावपळ, झेरॉक्स प्रती प्रमाणित करून घेण्याची गडबड, नवीन चेहऱ्यांचे उत्सुक डोळे परिसरात वावरत आहेत. ओळखी पाळखी पटताहेत का हे चाचपडणारे पालक, जुने विद्यार्थी आणि प्रवेशाच्या दाराजवळ ताटकळणारे घोळके.....


या पार्श्वभूमीवर मार्च ९९ मध्ये झालेल्या उच्च माध्यमिक शालान्त परीक्षेचे, शालान्त परिक्षेचे निकाल लागले आहेत. या निकालांचा मागोवा घेत विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या वाटा परिसरात शोधणारे हे सदर सुरू हेत आहे. दिशाचे हे चौथे वर्ष. आपणासारख्या सुजाण वाचकांचे सहकार्य, संस्था प्रमुखांचे मार्गदर्शन यांच्या जोरावर हे वाचकप्रिय सदर सुरू करताना मन आनंदाने भरले आहे. यंदाही प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी यांच्या सहकार्याचा प्राणवायू या सदरास मिळेल ही अपेक्षा आहे. तर आता निकालांच्या बातम्या.

### विज्ञान महाविद्यालय

आमच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचा मार्च ९९ मध्ये झालेल्या उच्च माध्यमिक परीक्षेच्या निकाल ८३.७३% लागला. महाविद्यालयातून सर्वप्रथम आलेला संकल्प गोखले ६०० पैकी ५४४ गुण मिळवून बोर्डाच्या विज्ञान शाखेच्या गुणवत्ता यादीत ११वा आला.

विशेष प्राविण्यासह १३, प्रथम श्रेणीत १३०, द्वितीय श्रेणीत ९० तर उत्तीर्ण श्रेणीत ९ विद्यार्थी महाविद्यालयातून उत्तीण झाले. एकूण ३७५ विद्यार्थी महाविद्यालयातून परीक्षेस बसले होते. महाविद्यालयातून दुसऱ्या क्रमांकावर येण्याचा मान वृषाली प्रधान तर तृतीय क्रमांकाचे उत्तीर्ण होण्याचा मान निखिल साने यास प्राप्त झाला. मिलिंद भाटे यास रसायन शास्त्रात १०० गुण मिळाले. संकल्पसह पाच विद्यार्थ्यांना पदार्थविज्ञानात ९९ गुण मिळाले.

संकल्प बद्दल-



संकल्प गोखले

संकल्पचे शालेय शिक्षण सफाळा येथील पंडित

हायस्कूल मध्ये झाले. चौथीच्या स्कॉलरशिप परीक्षेत तो जिल्ह्यात दुसरा तर ७वीच्या स्कॉलरशिप परीक्षेत राज्यात दुसरा आला होता. दहावीच्या परीक्षेत गुणवत्ता यादीत सहाव्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्यावर संकल्पने बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षण पूर्ण करावयाचे ठरविले होते. आता वैद्यकीय शाखेकडे तो जाणार आहे. संकल्पचे वडील स्वतः डॉक्टर असून सफाळा येथे त्यांचा दवाखाना आहे.

अभ्यासाबरोबरच संकल्पला संगीतात विशेष रूची असून तो उत्तम तबला वादक आहे. गायनाच्या परीक्षाही त्याने दिलेल्या आहेत. खेळांमध्ये बुद्धीबळ हा त्याचा विशेष आवडीचा खेळ असून तो उत्तम बुद्धीबळ पटू आहे.

### तृतीय वर्ष (पदवी) चा निकाल

आमच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचा तृतीय वर्षाचा (बी.एस.सी.) निकाल ८७% लागला. रसायनशास्त्रातील आमची अल्पा ठक्कर ही विद्यार्थिनी महाविद्यालयातून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली. तिला ८०० पैकी ६७८ गुण मिळाले. द्वितीय क्रमांकाने गणित विषयातील शिल्पा नातू ६६१ गुण मिळवून उत्तीर्ण झाली तर प्राणिशास्त्र विषयातील अमोल पटवर्धन ६५६ गुण मिळवून तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला. वनस्पतीशास्त्रात मृदुला सुरते (६१९ गुण) पदार्थविज्ञानात गजानन जगताप (५७९ गुण) तर सांख्यिकी मध्ये मैथिली चव्हाण (५२१) हे विद्यार्थी प्रथम आले.



अल्पा ठक्कर


अल्पा अकरावीपासून आमच्याच महाविद्यालयाची विद्यार्थिनी असून पदवीच्या तीनही वर्षात तिने प्रथम क्रमांक कायम ठेवला आहे. ठाण्याचे शेठ टी. जे. हायस्कूल मधून शालान्त परीक्षेचा निकालला ती शाळेतून दुसरी आली होती.

अध्यापनाची तिला पूर्वीपासून आवड असून ती शालेय विद्यार्थ्यांच्या शिकवण्या घेते. पदव्युत्तर स्तरावरील रसायन शास्त्रातील अभ्यास पूर्ण करून तिला प्राध्यापक व्हावयाचे आहे, असे तिने सांगितले. आपल्या यशाचे पहिले श्रेय ती आईला देते. तसेच गुरूजनांच्या मार्गदर्शनामुळे आपण यशस्वी झालो अशीही भावना तिच्या मनात आहे.

संकल्प गोखले, अल्पा ठक्कर व सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आमचे प्राचार्य सी. जी. पाटील, पदवी विभागाचे उपप्राचार्य डॉ. सी. म. सारंग व कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री. म.ह. दीक्षित यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

### कला वाणिज्य महाविद्यालय

बोर्डाच्या गुणवत्ता यादीत आपले नाव झळकावे असे प्रत्येक विद्यार्थ्याला वाटते. आमच्या कला महाविद्यालयातील विद्यार्थिनी किरण कवता हिने बारावीच्या कला शाखेचा गुणवत्ता यादीत ७७.५% गुण मिळवून चौदावा क्रमांक पटकावला व आपल्या मेहनतीचे चीज केले.



किरण कवता

किरणला लेखनाची आवड असून मुक्तपत्रकारितेकडे तिचा अधिक कल आहे. ती स्वतः उत्तम कविताही करते. पुढे इतिहास विषयात पदयुत्तर शिक्षण घेऊन IAS च्या परीक्षेस बसण्याची तिची इच्छा आहे. ती विद्यार्थी प्रतिनिधी मंडळावरही विद्यार्थिनी प्रतिनिधी (C.R.) म्हणून होती.

तिच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. सदाशिव गोखले, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य पिंगे व पर्यवेक्षिका अनघा देशपांडे यांनी किरणचे विशेष अभिनंदन केले आहे.

**धाडामोडी माध्यमिक विभागाचा**

सालाबादप्रमाणे यंदाही दि. २० एप्रिल ९९ ते १९ मे ९९ या कालावधीत इ. १० वी साठी उन्हाळी वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. या वर्गात मार्गदर्शन करण्यासाठी सौ. विजया कानडे, सौ. नंदिनी बर्वे, श्री. द. म. मेहेंदळे, सौ. राजे, श्री. अ. गो. टिळक, सौ. गाडगीळ इ. तज्ज्ञ शिक्षक व शाळेतील शिक्षक उपस्थित होते. या वर्गाचा लाभ सर्व विद्यार्थ्यांनी घेतला.

दि. ९ एप्रिल ९९ ते २४ एप्रिल ९९ या कालावधीत शाळेतील विद्यार्थ्यांसाठी चित्रकलेचे छंदवर्ग आयोजित करण्यात आले. या वर्गात स्केचिंग व एलिमेंटरी, इंटरमिजिएट परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या वर्गासाठी सौ. मंजिरी दांडेकर, श्री. विलास केळी, श्री. वासुदेव वैद्य यांनी मार्गदर्शन केले.

**आमच्या शाळांचे शालान्त निकाल**

मार्च १९९९मध्ये झालेल्या शालांत परीक्षेचा निकालात डॉ. बेडेकर विद्या मंदिर शाळेतून आशुतोष सुमंत देव याला ९१.८६ टक्के मिळवून बोर्डाच्या गुणवत्ता यादीत १४व्या क्रमांकावर झळकला. कपिल विनायक एडके (६८४/७५० ९१.२०%) गुणवत्ता यादीत १९व्या तर मिहिर शिरीष दोशी (६८१/७५० ९०.८०%) गुणवत्ता यादीत २२वाआला. शाळेचा एकूण निकाल ९४.८२% लागलाअसून ५२ विद्यार्थी विशेष प्रावीण्यासह, ९१ विद्यार्थी प्रथम वर्गात, ७० विद्यार्थी द्वितीय वर्गात तर २५ विद्यार्थी उत्तीर्ण श्रेणीत आले.




(छाया : प्र.ग. वैद्य)

**गुणवत्ता यादीत झळकलेले तीन विद्यार्थी मुख्याध्यापक सहस्त्रबुद्धेसर व पालकांसह**

अमिता साळवी ९०% गुण मिळवून शाळेतून चौथी आली आहे. शाळेचे मुख्याध्यापक श्री. अ.वि. सहस्रबुद्धे यांनी गुणवत्ता यादीत तिघांचे व सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

आमच्या आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून शालान्त परीक्षेस बसलेले सर्व म्हणजे १५१ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन निकाल १००% लागला आहे.



कुमार सौरभ चौधे

सौरभ चौबे हा विद्यार्थी ९०.५०% गुण मिळवून गुणवत्ता यादीत २४व्या क्रमांकावर झळकला. विशेष प्राविण्यासह ८३विद्यार्थी तर प्रथम श्रेणीत ४६ व द्वितीय श्रेणीत २२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. शाळेतून नियती खेडेकर (९०.५३%), दुसरी तर मनाली नाईक (९०.४०%), तृतीय क्रमाकांने उत्तीर्ण झाली.

शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हटकर यांनी सौरभ चुबे सह सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचेअभिनंदन केले.

**विषयातील यश**

डॉ. बेडेकर विद्यालयातून सर्व प्रथम व गुणवत्ता यादीत १४वा आलेला आशुतोष देवचे वैशिष्ट्य म्हणजे तो इंग्रजीत ९४ गुण मिळवून इंग्रजी विषयात सर्व प्रथम आला आहे.

या गुणी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे विद्या प्रसारक मंडळ व दिशा तर्फे विशेष अभिनंदन !

•••


With Best Compliments From

## NITION VALVE INDUSTRIES LTD.

D-115, Ghatkopar Industrial Estate
L.B.S. Marg, Ghatkopar (W.) Mumbai - 400 086. India
Tel. No. : 517 1315 / 1359 Fax No. : 517 0654 / 0436
E.Mail : niton@bom3.vsnl.net.in

*Manufacturer of Industrial Valves*
Cast : GATE, GLOBE AND CHECK VALVES
Size : up to 1.5"
Class : 150, 300, 600 and 800

Materials :
**Casting** : WCB, LCB, WC1, WC6, WC9, C5, C`12, CF3, CF8, CF3M, CF8M & CN7M
**Forging** : A105, F340, F316, F304L, F316L & F5
Specialised in Motor Operated & Pressure seal bonnet valves
Our Product is approved by : TDC/EIL/PDIL/TICB/KPG/UHDE/BR/H&G/LLOYDS.

# 'दिशा' वर्ष ३ रे लेख सूची



| क्र. | लेखाचे शीर्षक | लेखक | अं.क्र.व महिना | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|
| १ | अतिरेक्यांच्या राज्यात | गणेश खराडे | ७/जाने.९९ ते एप्रिल९९ | १७-२० |
| २ | अमर्त्य सेनच्या निमित्ताने | श्री. यशवंत साने | ४/ऑक्टो.९८ | २२-२६ |
| ३ | अमर्त्य सेन-अर्थशास्त्राचा मानवी चेहरा | डॉ. अशोक धोपेश्वरकर | ४/ऑक्टो.९८ | २७-२८ |
| ४ | अमेरिकेचे दुटप्पी विज्ञान धोरण | डॉ. विजय बेडेकर | ४/ऑक्टो.९८ | मुखपृष्ठ,२ व मलपृष्ठ ३ |
| ५ | अलीकडेच घेतलेला लक्षणीय ग्रंथ | प्रा. मोहन पाठक | ३/सप्टें.९८ | २७-२८ |
| ६ | आजचे युवा मानस | नेत्रा जोशी | २/ऑगस्ट९८ | २९-३० |
| ७ | आदिवासी क्षेत्रातील कुपोषणाची समस्या | प्रा. मोहन पाठक | ७/जाने.९९ ते एप्रिल९९ | २१-२३ |
| ८ | आवटी अभ्यास - एक दुर्लक्षित नाणकशास्त्रीय पैलू | श्री. पद्माकर प्र. प्रभुणे | ६/डिसें.९८ | ३४-३७ |
| ९ | इतिहासाच्या दर्शनाने पुनीत झालेले क्षण | आरती थाकळे | २/ऑगस्ट९८ | २१-२२ |
| १० | इंटरनेट क्रांती | डॉ. विजय बेडेकर | ६/डिसें.९८ | मुखपृष्ठ २ व १५ |
| ११ | ऋषिप्रज्ञेचा हृद्य आविष्कार- नारदीय सूक्त ऋग्वेद १०.१२९ | डॉ. प्र. वि. पाठक | २/ऑगस्ट९८ | २३-२४ |
| १२ | एकनाथांचे रुक्मिणी स्वयंवर | श्री. श. गो. धोपाटे | ३/सप्टें.९८ | १७-१९ |
| १३ | एकविसाव्या शतकातील भारतापुढील आव्हाने | गणेश खराडे | २/ऑगस्ट९८ | ३१-३२ |
| १४ | गर्जा जयजयकार... | सौ. मंजिरी दांडेकर | ७/जाने.९९ ते एप्रिल९९ | ९-१० |
| १५ | ग्रंथांच्या वाढत्या किंमती माहिती उपलब्ध होण्यातील अडसर | प्रा. मोहन पाठक | ४/ऑक्टो.९८ | २९-३२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६ | ग्रंथालय कायदे आणि सार्वजनिक ग्रंथालयांचा विकास-काही वस्तुस्थितींचे निर्देशन | प्रा. मोहन पाठक | ५/नोव्हें.९८ | ३२-३३ |
| १७ | घटकसंस्थांच्या ग्रंथालयांचे संगणकीकरण | प्रा. मोहन पाठक | ३/सप्टें.९८ | ३२-३३ |
| १८ | चक्रव्यूह | प्रा. य. भ. भिडे | ३/सप्टें.९८ | २०-२३ |
| १९ | तंत्रनिकेतने-सद्य परिस्थिती | श्री. सी. श्री. मजुमदार | १/जुलै.९८ | २७-२९ |
| २० | दिवस उत्साहाचे आणि उत्सवाचे कार्यक्रमांचे आणि व्याख्यानांचे | प्रा. मोहन पाठक | ६/डिसें.९८ | ३८ |
| २१ | 'दिशा' वर्ष क्र. २ची सूची | प्रा. मोहन पाठक | १/जुलै.९८ | ३६-३९ |
| २२ | धर्मप्रसार | डॉ. विजय बेडेकर | ५/नोव्हें.९८ | मुखपृष्ठ२व८ |
| २३ | धर्मप्रसाराचे काही नमुने | डॉ. वसंत हरी बेडेकर | ६/डिसें.९८ | २४-२७ |
| २४ | परिसर वार्ता | प्रा. मोहन पाठक | ७/जाने.९९ ते एप्रिल९९ | २५ |
| २५ | प्राचीन भारतातील शिक्षण पद्धती | श्री. श. गो. धोपाटे | १/जुलै.९८ | २५-२६ |
| २६ | प्राचीन भारतीय वाङ्मयीन लोकशाही | डॉ. वा. के. लेले | ६/डिसें.९८ | ९-१५ |
| २७ | पुराभिलेखाचा अभ्यास | डॉ. संजीव देसाई | ५/नोव्हें.९८ | १९-२३ |
| २८ | पुराणकालीन परराष्ट्र धोरण | श्री. ग. बा. तगारे | ५/नोव्हें.९८ | २४-२९ |
| २९ | पुन्हा स्वातंत्र्यासाठी लढा | डॉ. विजय बेडेकर | २/ऑगस्ट९८ | मुखपृष्ठ |
| ३० | 'प्रोजेक्ट' बनविण्यासाठी ग्रंथालय सहाय्य | सौ. भारती जोशी | २/ऑगस्ट९८ | २५-२६ |
| ३१ | बृहन्महाराष्ट्र प्राच्यविद्या परिषद - दुसरे अधिवेशन-उद्घाटनाचे भाषण | श्री. म. न. देशपांडे | १/जुलै ९८ | १४-१८ |
| ३२ | 'बॉबल्या राक्षसाचा बंदोबस्त- एक समस्या | प्रा. मोहन पाठक | ३/सप्टें.९८ | २९-३१ |
| ३३ | भारत देशा जागा हो | प्रा. य. भ. भिडे | २/ऑगस्ट९८ | १४-१७ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३४ | भारताची अणुचाचणी | डॉ. विजय बेडेकर | १/जुलै ९८ | मुखपृष्ठ२व४० |
| ३५ | भारतीय मूर्तीशिल्प (१) | डॉ. र. पु. कुलकर्णी | ४/आक्टो.९८ | ५-१० |
| ३६ | भारतीय मूर्तीशिल्प (२)<br>मूर्तीसाठी उपयुक्त शिळा | डॉ. र. पु. कुलकर्णी | ५/नोव्हें.९८ | ५-८ |
| ३७ | भारतीय मूर्तीशिल्प (३)<br>मूर्तीसाठी उपयुक्त लाकूड | डॉ. र. पु. कुलकर्णी | ५/नोव्हें.९८ | ९-११ |
| ३८ | भारतीय वास्तुशास्त्राचा परिचय (१७)<br>भुवनेश्वर येथील लिंगराज मंदिर | डॉ. र. पु. कुलकर्णी | १/जुलै ९८ | १९-२४ |
| ३९ | भारतीय वास्तुशास्त्राचा परिचय (१८)<br>प्रासादाचे वर्गीकरण | डॉ. र. पु. कुलकर्णी | २/ऑगस्ट ९८ | ५-१३ |
| ४० | भारतीय वास्तुशास्त्राचा परिचय (१९-२०)<br>भारतीय देवालय - एक संक्षिप्त परीक्षण | डॉ. र. पु. कुलकर्णी | ३/सप्टें.९८ | ५-१६ |
| ४१ | मला झपाटून टाकणारे पुस्तक<br>'मेड इन जापान',अकियो मारिटा आणि सोनी | वासुदेव देशपांडे | २/ऑगस्ट ९८ | २७-२८ |
| ४२ | मला आवडलेले पुस्तक | गणेश खराडे | ५/नोव्हें.९८ | ३४-३७ |
| ४३ | महाविद्यालयीन वार्ता | प्रा. मोहन पाठक | १/जुलै ९८ | ३३ |
| ४४ | महाविद्यालयीन वार्ता | प्रा. मोहन पाठक | २/ऑगस्ट ९८ | ३३ |
| ४५ | महाविद्यालयीन वार्ता | प्रा. मोहन पाठक | ३/सप्टें.९८ | ३४ |
| ४६ | महाविद्यालयीन वार्ता | प्रा. मोहन पाठक | ४/ऑक्टो.९८ | ३३ |
| ४७ | महाविद्यालयीन वार्ता | प्रा. मोहन पाठक | ५/नोव्हें.९८ | ३८ |
| ४८ | मूर्तींची मापे | डॉ. र. पु. कुलकर्णी | ७/जाने.९९ते एप्रिल९९ | १२-१६ |
| ४९ | मेरा भारत महान | डॉ. विजय बेडेकर | ३/सप्टें.९८ | मुखपृष्ठ२व४० |
| ५० | मौखिक परंपरेत पुस्तकांचे महत्व | प्रदीप कर्णिक | ५/नोव्हें.९८ | १२-१८ |
| ५१ | यो अस्याध्यक्षः परमे व्योमन्त्सो अंग<br>वेद यदि वा न वेद | डॉ. प्र. वि. पाठक | १/जुलै ९८ | ३०-३२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५२ | रघुदिग्विजय-इतिहास आणि राजनीतीशास्त्र यांचा समन्वय | डॉ. सो. मंजुषा गोखले | ४/ऑक्टो.९८ | ११-२१ |
| ५३ | लॉर्ड जॉन मॅन्यर्ड केन्स | प्रा. दिगंबर भिडे | ७/जाने.९९ते एप्रिल९९ | ११ |
| ५४ | वाचन व ग्रंथालये | श्री. विश्वनाथ शेंडे | ३/सप्टें. ९८ | २४-२६ |
| ५५ | वैदिक आणि इण्डोइराणी संस्कृतीचे भूसांस्कृतिक अनुबंध | डॉ. प्र. वि. पाठक | ६/डिसें. ९८ | १६-२३ |
| ५६ | सन २०४७ ची भारताची बखर | श्री. विश्वनाथ शेंडे | २/ऑगस्ट ९८ | १८-२० |
| ५७ | समान नागरी कायदा आवश्यक की अनावश्यक | गणेश खराडे | ५/नोव्हें.९८ | ३०-३१ |
| ५८ | संस्कृत काव्यातील शब्द चमत्कृती | डॉ. र. पु. कुलकर्णी | ६/डिसें.९८ | ५-८ |
| ५९ | साने गुरूजींनी केलेली भाषांतरे | प्रदीप कर्णिक | ७/जाने.९९ ते एप्रिल९९ | ५-८ |
| ६० | सायन्स अँड टेक्नॉलॉजिकल एनशन्ट इंडिया (इंग्रजी) | डॉ. विजय बेडेकर | १ जुलै. ९८ | ५-१३ |
| ६१ | साक्षरता अभियान | सुगंधा मुकादम | ७/जाने.९९ ते एप्रिल९९ | २४ |
| ६२ | सुभाषित | प्रा.डॉ.मो.दि.पराडकर | १/जुलै ९८ | ३ |
| ६३ | सुभाषित | प्रा.डॉ.मो.दि.पराडकर | २/ऑगस्ट ९८ | ३ |
| ६४ | सुभाषित | प्रा.डॉ.मो.दि.पराडकर | ३/सप्टें. ९८ | ३ |
| ६५ | सुभाषित | प्रा.डॉ.मो.दि.पराडकर | ४/ऑक्टो. ९८ | ३ |
| ६६ | सुभाषित | प्रा.डॉ.मो.दि.पराडकर | ५/नोव्हें ९८ | ३ |
| ६७ | सुभाषित | प्रा.डॉ.मो.दि.पराडकर | ६/डिसें. ९८ | ३ |
| ६८ | सुभाषित | प्रा.डॉ.मो.दि.पराडकर | ७/जाने.९९ ते एप्रिल९९ | ३ |
| ६९ | हनुमान देवत्व विकास | डॉ. सौ. मिनाक्षी पंडित | ६/डिसें. ९८ | २८-३३ |


सूची संकलन : सौ. मंजिरी दांडेकर
कला शिक्षिका, डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे.

६) पाल्याच्या फी, पुस्तके, वह्या, दप्तर, पाणी बाटली यासाठी व गणवेषाची योग्य ती आर्थिक सोय आधीच करणे जरूरीचे आहे.

वरील सूचना तंतोतंत पाळल्यास पालकास प्रवेश अर्ज योग्य वेळात मिळण्यास व योग्य वेळेत तो भरून देण्यास अडचण न होता व कोणत्याही प्रकारचे संकट न वाटता अर्ज देता येतील. संपूर्ण भरलेला अर्ज ठराविक दिवशी, ठराविक वेळी सांगितलेल्या जागी नेऊन देऊन त्याची पावती घ्यावी. जरुर वाटल्यास अर्ज देण्यापूर्वी त्याची एक झेरॉक्स प्रत आपणाकडे ठेवावी. पुढील कुठल्याही चौकशीसाठी अर्जाचा क्रमांक लक्षात असणे जरूरीचे आहे.

अर्ज भरून दिल्यावर ८-१० दिवसात प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांची यादी फलकावर लावतात. ती तशी न लागल्यास त्याबद्दलची चौकशी ज्यांच्याकडे अर्ज दिले त्यांच्याकडे करणे जरूरीचे आहे. याबाबत पालकांनी खालील गोष्टी टाळाव्यात.

१) स्वतःशिवाय दुसऱ्या कोणत्याही नातलग, मित्र, शेजारी, शाळेतील ओळखीचा कर्मचारी यांना चौकशी करण्यास न सांगणे.

२) अर्ज दिल्यावर दर आठवड्याला, सुट्टीच्या दिवशी शाळेत चौकशी न करणे.

याबाबतीत आपले मोठे पाल्य जरी त्याच शाळेत असले तरी याबाबतीत जागरूक असणे अत्यंत आवश्यक आहे. यादी लागल्यावर फी ची रक्कम कधी, कुठे भरणे, गणवेशाचा नमुना व पुस्तकांची यादी याची सविस्तर माहिती दिली जाते. व ती देण्यासाठी व त्यासाठी भेटण्यासाठी योग्य तो ३-४ दिवसाचा कालावधी मिळतो. एखाद्या पालकाला वैयक्तिक न टाळण्यासारखी अडचण आल्यास त्यांनी समक्ष वा दूरध्वनीमार्फत शाळेच्या वेळात त्या संबंधीची सूचना देणे जरूरीचे आहे. व आपला काळ वाढवून घेणे जरूरीचे आहे. अन्यथा मिळालेला प्रवेश आपण त्या वेळात न घेतल्यामुळे आपल्या मुलाच्या ऐवजी प्रतीक्षा यादीतील दुसऱ्या विद्यार्थ्यास मिळण्याची शक्यता आहे.

प्रवेशासंबंधीचा शासनाचा नियम फक्त शाळे जवळच्या व दूरच्या विद्यार्थ्यांच्या प्रमाणाबद्दल आहे. हे प्रमाण ८०-२० आहे.

बऱ्याच पालकांच्या बाबतीत अनुदानित व विनाअनुदानित शाळा याबद्दल संभ्रम आहे. या बाबतीत असे सांगावेसे वाटते की सर्व बालवाड्या अजूनपर्यंत विना अनुदानित आहेत कारण त्यावर शासनाचे नियंत्रण नाही. पण काही बालवाड्यांशी संलग्न असलेली प्राथमिक व माध्यमिक विद्यालये अनुदानित आहेत. म्हणजे त्या संलग्न प्राथमिक व माध्यमिक शाळांतील सर्व शासनमान्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते व इतर सवलती शासन देते. व या वेतनाच्या काही अल्प प्रमाणात इतर खर्च शासन उचलते पण तो फारच तुटपुंजा असतो. विना अनुदानित शाळांचा सर्व खर्च त्या चालविणाऱ्या संस्थानाच करावा लागतो. यात शासन नियमाप्रमाणे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते इतर सवलती, वीज, पाणी, दूरध्वनी बिले, इमारतीची डागडूगी, देखभाल खर्च, विद्यार्थ्यांसाठी अद्यावत प्रयोगशाळा, खेळाचे सामान वगैरे यांचे खर्च समाविष्ट आहेत. दुसरी अत्यंत महत्त्वाची पालकांनी लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे प्रत्येक शाळेतील प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या मर्यादित आहे.

बदलीवर येणाऱ्या पालकांची तर अवस्था आणखीन दयनीय आहे. शासनाने हल्ली त्यांची जबाबदारी टाळली आहे. शाळेच्या मुख्याध्यापकानाच, जागा असल्यास त्यांची सोय करावी लागते. यासाठी ज्या पालकांची बदली निश्चित होणार हे ज्यांना माहित असते त्यांनी बदलीच्या ठिकाणी असलेल्या नातेवाईकाकडून वा मित्राकडून चौकशी करून बदलीच्या आधी शक्य असल्यास एकदा येऊन आपला शाळेतील कुठल्याही वर्गातला प्रवेश निश्चित करून अथवा त्या विषयीची संपूर्ण माहिती तरी घेऊन ठेवावी म्हणजे त्यांना जड जाणार नाही.

आपल्या पाल्याच्या सर्वांगीण विकासासाठी चांगल्या शाळेत प्रवेश हवा असल्यास पालकांनी याबाबतीत अतिशय सावध असणे जरूरीचे आहे.

संपादक - अचल कुमार टिल्लू